सायंदैनिक
प्राजक्त
संस्थापक व आद्य संपादक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी


श्रीपरशुराम


श्रीकोळेश्वर


श्रीयोगेश्वरी

भावे मित्र मंडळाचे द्वै मासिक

# ‘भावे-प्रयोग’

भावे मित्र मंडळ
एक परिवार

भावे मित्र मंडळाचे द्वैमासिक एप्रिल, २०२३

## नवकथेचे आद्य प्रवर्तक पुरुषोत्तम भास्कर भावे.

© शशिकिशोर दत्तात्रय भावे, पुणे.

**भा**वे कुलातील अनेक रत्नांपैकी हे एक तेजस्वी व्यक्तीमत्त्व. कॅलिडोस्कोपमध्ये जसे अनेक विलोभनीय आकृत्यांचे नयनमनोहारी दृश्य दिसते तसेच पु.भा.भाव्यांचे व्यक्तीमत्त्व. साहित्यविश्वात त्यांनी आश्चर्यकारक कामगिरी केली. कथा, दीर्घकथा, कादंबरी, निबंध, राजकीय पत्रकारिता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, इ. विविध वाङ्मयप्रकारात त्यांनी अनिर्बंध संचार केला. त्यातही त्यांचे वैशिष्ट्य असे की त्यांनी नुसते लिखाण केले नाही तर त्यांचे लिखाण वाचकांना झपाटून टाकते. एकदा वाचायला घेतले की ते वाचून पुरे झाल्याशिवाय वाचकांना सोडवत नसे. एखादा धबधबा अंगावर कोसळावा तशी वाचकाची अवस्था होते. भावनांनी ओथंबलेल्या प्रवाहात वाचक चिंब भिजून जातो. भाषेतील उत्कटता, मांडणी, संदर्भ, उपमा, प्रतिमा यांची निवड, स्तिमित करणारी उत्कटता सर्वच लाजवाब.



१२ एप्रिलला त्यांची जयंती, त्यानिमित्ताने एक सामान्य वाचक म्हणून केलेले त्यांचे हे स्मरण.

त्यांच्या सर्वच वाङ्मयाचा विचार या लहानशा लेखात करणे हे केवळ अशक्यच. त्यामुळे या लेखात त्यांच्या कथावाङ्मयाचाच विचार केला आहे.

मराठी कथावाङ्मयाचा आज मोठा विस्तार झाला आहे. पण विसाव्या शतकाच्या चवथ्या दशकात एक क्रांतीकारक बदल झाला. तोपर्यंत मराठी कथा थोड्याफार प्रमाणात लिहिली जात होती, पण बहुतेक कथावाङ्मय वर्णनपर, परंपरा, चालीरीती यांची भलावण करणारे होते. बदल करण्याचा थोडाफार प्रयत्न हरी नारायण आपटे, ना.ह.आपटे, गुर्जर, र.वा.दिघे यांच्या कथांमधून जाणवतो, पण बदलत्या काळानुसार नव्या परिस्थितीनुसार बदल हवा होता.

या नव्या कथा प्रकारातून ही जाणीव, हा बदल नवकथेच्या लेखकांच्या कथांमधून व्यक्त होऊ लागला. कथेच्या या दालनात अनेक लेखकांचे वाङ्मय, कथा प्रसिध्द होऊ लागल्या. या लेखकांच्या समूहात ज्यांना आज नवकथाकार म्हणून मिरविले जाते व ज्यांच्या कथांवर आपल्या पसंतीची मोहोर शेकडो वाचकांनी आणि समीक्षकांनीही एकमताने उमटवली त्यातील प्रमुख चार कथाकार म्हणजे १) पु.भा.भावे २) अरविंद गोखले ३) गंगाधर गाडगीळ ४) व्यंकटेश माडगूळकर. नवकथेच्या आद्य प्रवर्तकांमध्ये पु.भा.भाव्यांचा समावेश करावा लागेल. अर्थात प्रस्तुत लेखात फक्त पु.भा.भावे यांच्या कथावाङ्मयाचे ओझरते दर्शन घेणार आहोत.

पु.भा.भाव्यांचे एकूण ३२ कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. संख्यात्मक विचार करता त्यांच्या कथांची संख्या २५०-३०० पर्यंत आहे. पण विचार करायचा आहे तो मुख्यत: गुणात्मक. तरीही म्हणावे लागेल की पु.भा.भाव्यांच्या कथा संख्यात्मक व गुणात्मक दृष्ट्याही समृध्द आहेत. त्यांची कोणतीही कथा घ्या, त्यांनी वाचकांना कधीही निराश केलेले नाही. किमान पातळीच्या खाली त्यांची कोणतीही कथा नाही.

‘फुकट’ ही त्यांची पहिली कथा ‘किर्लोस्कर’ मासिकात प्रकाशित झाली, तेव्हा ते पंधरा वर्षांचे होते. ‘पहिला पाऊस (१९४६) या पहिल्याच कथासंग्रहाने त्यांना प्रतिष्ठा मिळवून दिली. ‘स्वप्न’(१९४८)‘सतरावे वर्ष’(१९४९)‘ध्यास’(१९५०)‘फुलवा’(१९५३)‘मुक्ति’(१९५४) ‘देव्हारा’(१९५६)‘बंगला’(१९५६)‘रूप’(१९५६)‘वैरी’(१९६२) ‘हिमानी’(१९६६)‘ओवाळणी’(१९६८)‘प्रेम’(१९७३)‘आवर्त’ (१९७७) हे त्यांचे कथासंग्रह विशेष गाजले. त्यांच्या दुष्मन, ध्यास, मुक्ती, फुलवा, देव्हारा, लिप्पीमी, सीमेवर, दु:ख, पाषाण, एका झाडाचा मृत्यू, काळ काम व वेग, सतरावे वर्ष, आजार, रूप, पहिला पाऊस, स्वप्न इ. कथा पहा. वाचकांना जाणवणारे विशेष म्हणजे शद्बांवरची हुकुमत, कथेची सुरुवात व शेवट. कथेची चिरेबंद मांडणी. त्यांच्या कथेची सुरुवात वाचकाला झपाट्याने खेचून घेते ती शेवटापर्यंत. कथेच्या सामर्थ्याबद्दल इंग्लीश टीकाकाराने म्हटले आहे की अशी कथा 'Which hooks the reader to begin with and holds till the end.' ‘अथपासून इतिपर्यंत वाचकांना खिळवून ठेवते ती कथा.’ पु.भा.भाव्यांच्या सर्वच कथा या उक्तीनुसार सार्थ ठरतात. कथेचा शेवट अनपेक्षित करणे हा त्यांचा हातखंडा आहे. या दृष्टीने

(पान क्र. ४ वर)

# संपादकीय

भावे मित्र मंडळाची सोळावी वार्षिक सर्वसाधारण सभा या वर्षी झूम या मिटिंग ॲप वरून शनिवार, दि. २५ मार्च २०२३ या दिवशी झाली. या सभेचे वृत्त पान क्र ३ वर दिलेले आहे.

Unsung Heros गाऊ त्यांना आरती! या लेखमालिकेतून भावे कुलात आपल्या कार्यकर्तृत्वाने विविध क्षेत्रात ज्यांनी आपला ठसा उमटवला अशा व्यक्तींची माहिती देण्याच्या या उपक्रमाला वाचकांची पसंती असल्याचे त्यांच्या प्रतिक्रियांमुळे/येणाऱ्या फोनमुळे लक्षात येते आहे. अनेक अलौकिक, दुर्मिळ गुणवत्ता असलेल्या भावे कुलातील व्यक्ती केवळ प्रसिद्धीचे कोंदण न लाभल्यामुळे विस्मृतीत गेल्या. अशा व्यक्तिमत्त्वांचा परिचय करून देणे हे या सदराचे महत्त्व आहे. कुलवृत्तांतात आपल्या घराण्यातील अशा व्यक्तींचा नुसता नामोल्लेख किंवा साधा परिचय असेल अशांनी त्यांची माहिती आम्हास पाठवावी, म्हणजे ती पुढील अंकांमधून प्रकाशित करता येईल.

'उद्योजक म्हणून घडताना' ही भाव्यांमधील व्यावसायिकांनी आपण व्यवसाय का करू लागलो, त्या मागची प्रेरणा कोणाची, व्यवसाय करताना अडचणी काय आल्या अशा अनुभव कथनाची ही लेखमाला आहे. आपल्याच उद्योगाची माहिती कशाला द्यायची, किंवा कशी द्यायची असा विचार न करता अशी माहिती जरूर लिहून पाठवावी. आपले व्यावसायिक अनुभव मराठी, इंग्रजी, हिंदी या कोणत्याही भाषेतून साधारण १००० ते १२०० शब्दांत लिहून bhave1956@gmail.com या मेलवर पाठवावेत. व्यवसायात नव्याने येणाऱ्या भावी पिढीसाठी हे अनुभव निश्चित मार्गदर्शक ठरतील. अनेकांना लिखाणाची सवय नसते अशांनी ऑडियो रेकॉर्डिंग करून ते पाठविल्यास त्यावरूनही लेख तयार करून घेता येईल.

'भावे-प्रयोग'या प्राजक्ततर्फे प्रकाशित होणाऱ्या अंकात आपला सहभाग लिखाणाच्या रूपाने हवा आहे. आपल्यात सिद्धहस्त लेखक आणि कवी आहेत, त्यांचेही साहित्य प्रकाशित करायची संधी मिळावी असे आवाहन याद्वारे मी करीत आहे. अनेकांना मी भेटत असतो, त्यावेळी त्यांना तुम्ही तुमच्या पद्धतीने लिहून द्या, त्यावर संपादकीय संस्कार करून, लिखाण व्यवस्थित करून घेईन असे मी सांगत असतो. त्यामुळे आपल्याला सुचलेल्या विषयावरील लिखाण जरूर पाठवावे, ही विनंती.

**अभय शंकर भावे**
९४२२३०६०३३ Whats App / ७०२०६४५८९२

पोस्टाने अंक न मिळण्याचे प्रमाण भरपूर आहे. अंक ई मेलने पाठविण्याचा प्रयोग चांगलाच यशस्वी ठरतो आहे. असाही एक सूर ऐकू आला की व्हॉटस् ॲपवर अंक पाठवा, पण ते शक्य नाहीये हे लक्षात घेऊनच ई-मेलचा मार्ग निवडला आहे. कुटुंबातील सर्वांचे मेल ॲड्रेस पाठवावेत. अजूनही अनेकांचे मेल ॲड्रेस उपलब्ध झालेले नाहीत, तरी आपले मेल ॲड्रेस bhave1956@gmail.com या मेलवर कळवावेत म्हणजे पुढील अंक मेलनेही पाठवता येतील. मेल करताना आपल्या संपूर्ण नावासह पूर्ण पत्ता व फोन नंबरही कळवावा.

## अंकाबद्दल प्रतिक्रिया

नमस्कार, प्राजक्त फेब्रु.२०२३ चा अंक उत्तम. ती.सुशीला वैद्य, माई यांचा परिचय unsung heros मुळे झाला. तसेच आमचे मित्र रंगभूषाकार प्रभाकर भावे यांच्याबद्दल सहवेदना लेख खूपच माहितीपूर्ण आहे. त्यांचे वडील अण्णा भावे आमचे भजनी मंडळाचे पेटी वादक. त्यांना जलमंदिर प्रकरणात झालेला त्रास ऐकला होता. ब्राह्मणांना पाण्यात पाहणाऱ्या पुढाऱ्यांमुळे त्यांना फार त्रास झाला होता. मिश्किल स्वभावाचे प्रभाकर भावे यांना वंदन.

**प्रसाद रामकृष्ण भावे, पुणे.**

## श्री. उमा महेश्वर भावे फाऊंडेशन (रजिस्टर्ड)

'श्री रक्षा', गुडीकेरी, श्री रंगनाथ मंदिराजवळ,
सोरब ५७७४२९ जि. शिवमोग्गा.

शिवमोग्गा, ता. जि. सोरब येथे श्री रंगनाथ मंदिराजवळ श्री उमामहेश्वर मंदिर आहे. खूप वर्षांपूर्वी देशावरील लिमये कुटुंबातील कन्येचा विवाह येथे भावे कुटुंबातील मुलाशी संपन्न झाला. त्याच वेळी लिमये ह्यांनी पिण्याची विहिर व उमामहेश्वर मंदिर बांधले असा उल्लेख आहे. भावे कुटुंबातील श्री. सूर्यनारायण भावे आणि कुटुंब मंदिराची पूजा, अभिषेक, दीपोत्सव हे सर्व यथासांग करीत होते. सध्याच्या काळात मंदिराची संपूर्ण जबाबदारी सोरबच्या समस्त भावे कुटुंबियांनी स्वीकारली आहे. त्या करिता श्री उमामहेश्वर भावे फाऊंडेशनची स्थापना केली आहे.

३-४ वर्षांपूर्वी मुख्य रस्त्याच्या रुंदीकरणासाठी मंदिराची जागा सोडावी लागली. खूप वर्ष जुने मंदिरही जीर्ण झाले होते. मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा अशी सोरबच्या सर्व भावे कुटुंबाची इच्छा होती.

समस्त पुरोहितांच्या सल्ल्यानुसार मंदिर निर्माण करण्याचे ठरविले व त्या करिता श्रीक्षेत्र धर्मस्थळ, श्रीक्षेत्र वरदहळ्ळी व श्रीक्षेत्र सोंदामठ ह्या सर्वांच्या कृपाशिर्वादाने शिलामय मंदिर निर्माण केले गेले. मंदिराचे तीन भागात विभाजन केले आहे. १) गाभारा २) नंदी असलेली जागा ३) घंटामंडप व त्याच बरोबर शिलामय गणपतीची मूर्ती व देवीची मूर्ती यांची प्रतिष्ठापना झाली आहे. ह्यासाठी आत्तापर्यंत एकूण पंचवीस लाख रुपयांचा खर्च झाला आहे.

आता शिलामय घंटामंडप, मुख्यद्वार, फरशी(फरसबंद) मंदिराभोवती कुंपण आणि सभामंडप यासाठी एकंदर पन्नास लाख रुपयांची गरज आहे. येत्या दिवसात श्री उमा महेश्वर भावे फाऊंडेशन हा ट्रस्ट फक्त धार्मिक कार्यक्रमासाठी मर्यादित न राहता बहुपयोगी सभाभवन निर्माण करून शैक्षणिक, सांस्कृतिक, कला असे विकासोपयोगी कार्यक्रम करणार आहे. **सर्व भावे कुलातील कुलबंधूंना व सर्व भक्तांना अशी विनम्र विनंती की या कामासाठी उदार मनाने श्री उमामहेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कामासाठी मदत करावी. रक्कम ट्रान्सफर करण्यासाठी बँक अकौंट डिटेल्स खाली दिले आहेत. श्री उमा महेश्वर फाऊंडेशनचा ई-मेल ॲड्रेस** shriumamaheshwarabhavefoundation@gmail.com **हा आहे.**

**अध्यक्ष/पदाधिकारी**
**श्री उमा महेश्वर भावे फाऊंडेशन(रजिस्टर्ड)**

Account Name - Shri Umamaheshwar Bhave Foundation(Reg.)
Bank - Canara Bank, Branch Sorab.
Saving A/C No - 0573101029333
IFSC - CNRB0000573

# भावे मित्र मंडळ एक परिवार

**नोंदणीकृत कार्यालय –** १२४४, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११००४
**नोंदणी क्र –** महाराष्ट्र/३५७/२००६/पुणे दि. २१.०२.२००६

## शनिवार, दि २५ मार्च, २०२३ ला झालेल्या सोळाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे वृत्त.

शनिवार, दि २५ मार्च, २०२३ या दिवशी भावे मित्र मंडळाची सोळावी वार्षिक सर्वसाधारण सभा, झुम या ऑनलाईन ॲपवरून संपन्न झाली. ही सभा भावे मित्र मंडळाच्या संमेलनात दरवर्षी होत असते. परंतू या वर्षी संमेलन होऊ शकले नाही त्यामुळे ही सभा झुम या ऑनलाईन ॲपवरून घेतली गेली. बाहेरगावच्या सदस्यांनाही सभेत सहभागी होता यावे म्हणून ही सभा ऑनलाईन घेतली गेली.

सभेला मंडळाचे अध्यक्ष, श्रीवर्धन वामन भावे, पुणे, उपाध्यक्ष जयंत गंगाधर भावे, दापोली, खजिनदार, विनय अरुण भावे, पुणे, सचिव, सौ. ज्योती अभय भावे, पुणे, अभय शंकर भावे, पुणे, आशीष रमेश भावे, पुणे, उदय नारायण भावे, पुणे, कृष्ण वैजनाथ भावे, बडोदा, श्रीकांत शरद भावे, नागपूर, विश्वजीत अरूण भावे, औरंगाबाद हे कार्यकारिणीचे सदस्य, पर्शराम गोविंद भावे, पुणे हे कार्यकारिणीचे सल्लागार सदस्य उपस्थित होते. याव्यतिरिक्त डॉ.अरुंधती भावे, नागपूर, मंजुषा हेमंत भावे, पनवेल, अमिताभ श्रीधर भावे, पुणे, राममोहन नीलकंठ भावे, मुंबई, बीना भावे हे सदस्य वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित होते.

मागील वर्षभरात दिवंगत झालेल्या भावे कुलातील ज्ञात-अज्ञातांना श्रध्दांजली वाहून वार्षिक सर्व साधारण सभेची सुरूवात झाली.

भावे मित्र मंडळाच्या स्थापनेपासून लेखापरीक्षणाचे काम करणारे **सी.ए. राजेंद्र श्रीकांत भावे, पुणे** व कार्यालयीन काम पाहणारे **माधव मराठे** यांचे आभार मानून सभेचे कामकाज पुढे सुरू झाले.

**वार्षिक सर्वसाधारण सभेत खालील विषयांवर चर्चा झाली.**

१) वर्ष २०२१-२०२२ चा मंडळाचा वार्षिक अहवाल **अभय शंकर भावे, पुणे** यांनी वाचला.

मंडळाच्या कार्यकारिणीची बैठक, वार्षिक सर्वसाधारण सभा ठरविण्यासाठी व भावे शिक्षण निधीच्या आवाहनानुसार आलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांनुसार विद्यार्थ्यांना निधी वाटप ठरविण्यासाठी झाली.

दर वर्षी होणारे वार्षिक स्नेहसंमेलन मागील वर्षी घेता आले नाही. त्यामुळे त्या वर्षाची पंधरावी वार्षिक सर्वसाधारण सभा झूम या मिटिंग ॲपवरून दि. २६ फेब्रुवारी २०२२ या दिवशी घेतली.

**हा अहवाल अध्यक्षांचे अनुमतीने स्वीकारला गेला.**

२) मंडळाच्या लेखा परीक्षकांकडून आलेल्या वर्ष २०२१-२०२२ या वर्षाअखेरीच्या नफा-तोटा पत्रक व ताळेबंदाचे वाचन मंडळाचे कोषाध्यक्ष **विनय अरुण भावे, पुणे** यांची प्रकृती ठीक नसल्याने व ते सभेस हजर असले तरीही त्यांच्या परवानगीने **आशीष रमेश भावे, पुणे.** यांनी केले आणि नफा-तोटा पत्रक व ताळेबंद स्वीकारण्यासाठी सभेसमोर प्रस्ताव ठेवला. त्यावरील वेगवेगळ्या चर्चेनंतर **कृष्ण वैजनाथ भावे, बडोदा व जयंत गंगाधर भावे, दापोली** यांनी या प्रस्तावासाठी अनुमोदन दिले. सभेतील सर्वांच्या सहमतीने नफा-तोटा पत्रक व ताळेबंद स्वीकारण्यात आला.

३) सन २०२२-२३ या वर्षासाठी लेखा परीक्षक म्हणून **सी.ए. राजेंद्र श्रीकांत भावे, पुणे.** यांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव **श्रीवर्धन वामन भावे, पुणे.** यांनी मांडला. **आशीष रमेश भावे, पुणे. व विश्वजीत अरुण भावे, औरंगाबाद.** यांनी या प्रस्तावासाठी अनुमोदन दिले. हा प्रस्ताव सर्वानुमते स्वीकारण्यात आला.

४) आयत्या वेळच्या विषयात मंडळाचे अध्यक्ष **श्रीवर्धन वामन भावे, पुणे** यांनी विषय मांडला की **जयंत गंगाधर भावे, दापोली** यांचेशी डोंबिवली येथील अखिल भारतीय चित्पावन ब्राह्मण महासंघाने संपर्क करून भावे मित्र मंडळाने दहा हजार रुपये भरून त्यांचे सदस्यत्त्व स्वीकारावे असे आवाहन केले होते. अखिल भारतीय चित्पावन ब्राह्मण महासंघ, डोंबिवली या संस्थेचे आजीवन सदस्य होण्यासाठी त्या संस्थेची नोंदणी फीची रक्कम रुपये दहा हजार खर्च करावेत असा ठराव **श्रीवर्धन वामन भावे, पुणे** यांनी मांडला. या ठरावाला **श्रीकांत शरद भावे, नागपूर व पर्शराम गोविंद भावे, पुणे** यांनी अनुमोदन दिले. सर्वानुमते तो ठराव स्वीकारला गेला.

यानंतर अध्यक्षांचे परवानगीने मंडळाचे उपाध्यक्ष **जयंत गंगाधर भावे, दापोली.** यांनी संमेलनाचे संदर्भात विषय मांडला. ते म्हणाले की 'कोरोना संपून दोन वर्षे झाली आहेत. सप्टेंबर २०२२ ला झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत आपण पुण्यात संमेलन घेण्याचे ठरविले होते. काही कारणाने ते होऊ शकले नाही. पण आता संमेलन लगेचच घेणे आवश्यक आहे. संमेलन एका दिवसाचे म्हणजे सकाळी ९-३० पासून संध्याकाळ ५-३० पर्यंत घेतल्यास पुण्यात संमेलन घेता येईल का याचा विचार व्हावा. सांगली, सातारा, कोल्हापूर, अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद, मुंबई, ठाणे या सर्व ठिकाणाहून सकाळी पुण्याला पोचणे शक्य आहे, असे माझे मत आहे.' यावर चर्चा करताना अध्यक्ष श्रीवर्धन वामन भावे म्हणाले की, 'पुणे, मुंबई सारख्या शहरांमध्ये संमेलन घ्यायचे झाले की त्या त्या शहारतील वाढत्या किंमतींचा आणि कोरोना नंतर त्या किंमती अधिकच वाढल्या आहेत याचा विचार करावा लागेल.' संमेलनासंबंधीच्या चर्चेत सौ. ज्योती अभय भावे, पुणे, अभय शंकर भावे, पुणे, आशीष रमेश भावे, पुणे, कृष्ण वैजनाथ भावे, बडोदा, श्रीकांत शरद भावे, नागपूर, विश्वजीत अरूण भावे, औरंगाबाद, अमिताभ श्रीधर भावे, पुणे, पर्शराम गोविंद भावे, पुणे यांनीही आपापली मते मांडली व येत्या काही दिवसात संमेलनाच्या दृष्टीने विचार करून संमेलनाच्या तारखा ठरवाव्यात असे ठरले.

यानंतर भावे मित्र मंडळाचा कॉर्पस फंड कसा वाढेल यावर चर्चा झाली. यातही उपस्थित सदस्यांनी चर्चा केली.

वरील सर्व चर्चेनंतर सोळाव्या वार्षिक सर्व साधारण सभेची सांगता अध्यक्षांच्या संमतीने झाली.

(पान १ वरून)
पाषाण, आजार, दु:ख, रूप या कथा विलक्षण आहेत. पुतळा सारख्या कथेत गोष्टीचा शेवट ते पहिल्याच वाक्यात सांगून टाकतात, तरीही वाचकाला ते शेवटापर्यंत बांधून ठेवतात. संपूर्ण कथा संपेपर्यंत वाचक ती खाली ठेवू शकत नाही. पहिल्यापासून पकड घेणारी सुरुवात आणि चकित करणारा शेवट ही त्यांची जबरदस्त अस्त्रे.

हीच जबरदस्त ताकद त्यांच्या विषयांच्या विविधतेत आहे. या बाबतीत त्यांची जुन्या कथांशी जवळीक आहे, नव्हे पूर्वीच्या लेखकांपेक्षा त्यांची Range फार मोठी आहे. लहान मूल, कुमारावस्थेतील मुलगा, छत्तीसगडची युवती, आजारी माणसे, वृध्द मित्र, विकृत वाटणारा पण ध्येयासाठी प्राणार्पण करणारा, ध्येयवेडा देशभक्त उदा. मुक्ती, ध्यास मधील आत्माराम सारखी व्यक्ती, मुरब्बी जमीनदार, तत्त्वाला सामोरी जातानाही व्यवहार न सोडणारी, तरीही कोमल भावना जपणारी 'सीमेवर' या कथेतील नायिका, संगम मधील प्रेमवेडी पण पतीशी एकरूप झालेली सुमन, इतकेच काय 'एका झाडाचा मृत्यू' मधील झाड, 'पाषाण' मधील व्यसनी तरीही तत्त्वनिष्ठ दारुडा, असंख्य पात्रे, असंख्य विषय, विविध प्रसंग तरीही कथेवरील, शद्बांवरील घट्ट पकड आणि साक्षात् मद्यमय भाषा. पु.भा.भाव्यांनीच एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे जीवनानुभव कोमट मनाने घेणे त्यांना आवडत नाही, नव्हे तो त्यांचा पिंडच नाही. त्यांची कथा खिळवून ठेवते, भाषा धबधब्यासारखी खळाळत येते तरीही ती समर्पक असते. कथा परिणामकारक असली पाहिजे हा निकष पु.भा.भावे तंतोतंत पाळतात, नव्हे ती परिणमकारकता आपोआपच साधली जाते.

उत्कट प्रेमकथा हे त्यांच्या लेखणीचे एक सामर्थ्य, म्हणूनच त्यांचे समकालीन कथाकार गंगाधर गाडगीळ म्हणतात, 'पु.भा.भाव्यांसारख्या सुंदर प्रेमकथा इंग्रजी वाङ्मयातही अभावानेच आढळतात.'

म्हणूनच चिकित्सक समीक्षकांनीही त्यांच्या कथांना डोक्यावर घेतले आहे. ए १ हा दर्जा त्यांना केव्हाच मिळाला आहे. पूर्वीच्या कथा या वर्णनपर होत्या. मानवी मनाचा, व्यक्तीच्या भावनांचा 'स्वानुभूत वासाचा' स्पर्श त्यात फारसा नसावा असे वाटे. हे सर्व दोष पु.भा.भाव्यांच्या कथांत अभावानेच आढळतील.


पु.भा.भाव्यांच्या या कथाजडित रत्नहारातील मौल्यवान रत्नांची निवड हे अवघडच. तरी पण पु.भा.भाव्यांच्या पाच श्रेष्ठ कथा निवडायच्या झाल्यास माझ्या मते १) दुष्मन २) सीमेवर ३) सतरावे वर्ष ४) फुलवा ५) स्वप्न या कथा अप्रतिम. वाचकांनी त्या आवर्जून वाचाव्या अशा. दुष्मन कथा वाचून वाचक दीर्घकाळ अस्वस्थ होतात हा माझ्याप्रमाणे अनेकांचा अनुभव आहे. अर्थात ही माझी मते आहेत. काहींना ते हिंदुत्त्वनिष्ठ, स्वमताग्रही वाटतात. पण एक निर्विवाद की त्यांनी त्यांच्या मतांशी कधी तडजोड केली नाही. पण त्यामुळे त्यांच्या लेखनशैलीवर त्यांनी कसलीही बाधा येऊ दिली नाही.

एक नि:संशय खरे आहे की अलौकिक भाषाप्रभुत्त्व, कथा या वाङ्मयप्रकारावर घट्ट पकड, उत्कृष्ट कथेच्या निकषांवर सर्वस्वी उतरणारे आणि नवकथाकारांच्या उद्गात्यांपैकी अग्रस्थानी असलेले पु.भा.भावे यांचे कथावाङ्मय विलोभनीय आहे. त्यांच्या कथा म्हणूनच प्रत्येकाने वाचाव्यात अशा आहेत.

त्यांच्या स्मृतीला वंदन करून एका वाचकाचे दृष्टीतून घडलेले त्यांचे हे दर्शन !!!

⌘⌘⌘

**संपर्क :** प्लॉट नं ९, सरगम, नवकेतन सोसायटी,
कोथरुड, पुणे ४११०३८ **भ्रमणध्वनी :** ७५५९४४४५२१




**अश्विनी भावे-काणे** ह्या टिळकनगर, नागपूर येथील प्रा. मुरलीधर लक्ष्मण भावे ह्यांच्या कन्या आहेत. नागपूरचे डॉ.नारायणराव मंगरुळकर हे त्यांचे संगीतातले गुरु. नागपूरला असताना त्यांना गायनात अनेक बक्षिसे मिळाली. लग्नानंतर त्या लंडनला स्थायिक झाल्यावर तेथे त्यांनी नामवंत गायक पं. हृदयनाथ मंगेशकर, श्री. श्रीधर फडके, पद्मश्री पद्मजाताई फेणाणी-जोगळेकर, पं. अनुप जलोटाजी ह्यांचे बरोबर कार्यक्रमात सहभाग घेतला. लंडनला स्वराधना नावाचे स्वत:चे संगीत विद्यालय उघडले. ६ ते ६० वर्षे वयाचे विद्यार्थी तेथे संगीत शिकतात. नुकताच त्यांच्या विद्यालयाचा वार्षिक कार्यक्रम झाला. त्यात त्यांनी इंग्रजीत लिहिलेले 'अर्घ्य' नावाचे संगीतातील राग व बंदिशींवरील पुस्तक हिलिंग्डनच्या मेयर बेकी हॅगर ह्यांचे हस्ते प्रकाशित केले. मेयर मॅडमनी त्यावेळी तीन लाख हिलिंग्डन रहिवाशांतर्फे त्यांचे कौतुक केले व आभार मानले.

**भावे मित्र मंडळातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!!!**




**रोहन दीपक भावे, दापोली** याने कृषी महाविद्यालय, दापोली येथून नुकतेच कृषी अर्थशास्त्रात एम.एस्सीचे शिक्षण पूर्ण केले आहे. रोहनने लिहिलेला कोळथरे देवस्थानाच्या उत्सवाचे वर्णन करणारा लेख या पूर्वीच्या अंकात प्रसिध्द झाला आहे. तसेच त्याच्या कविताही अंकात प्रसिध्द झाल्या आहेत. भावे शिक्षण निधीकडून त्याला बारावीपासून मदत दिली जात होती.




**प्रद्युम्न रवी भावे, गोवा** याने डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोली येथून नुकतेच बी.एस्सी. इन हॉर्टीकल्चर हे शिक्षण प्रथम वर्ग व डिस्टिंगशन मिळवून पूर्ण केले आहे.

**रोहन व प्रद्युम्नच्या पुढील वाटचालीसाठी भावे मित्र मंडळाकडून शुभेच्छा!**

## Unsung Heros
## गाऊ त्यांना आरती!

© **शशिकिशोर दत्तात्रय भावे, पुणे.**

**१) जून पथारिया घराण्यातील व्यासंगी व विद्याव्रती डॉ. कै. वामनराव विश्वास भावे.**

भावे घराण्यातील ज्या मंडळींनी महाराष्ट्राबाहेर जाऊन कर्तृत्त्व गाजवले अशा बऱ्याच व्यक्ती होऊन गेल्या. यामध्ये जून पथारिया घराण्यात अनेक जणांनी आपल्या कार्यकर्तृत्त्वाचा ठसा उमटविला. यातीलच एक यशस्वी नाव म्हणजे डॉ. वामनराव विश्वास भावे. आप्तस्वकीयात ते नाना या टोपणनावाने ओळखले जात. त्यांचा जन्म त्यावेळच्या मध्यप्रांतातील (आत्ताचा मध्यप्रदेश) सागर या गावी दि. २७ मार्च १९१४ (गुढीपाडवा) या दिवशी झाला. त्यांची बहुतांश कामगिरी शिक्षणशास्त्रातली होती.

नानांचे बालपण व त्यांचे व्यक्तीमत्त्व या विषयी बऱ्याच जणांनी लिहून ठेवले आहे, सुहृदांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे. त्यांच्या भगिनी श्रीमती शीला घारपुरे त्यांचे विषयी लिहितात, 'नाना खूप हुषार, कुशाग्र बुध्दिमत्तेचे कर्तबगार व तितकेच प्रेमळही होते. एखादा प्रसंग प्रभावीपणे रंगवून सांगण्याची हातोटी त्यांचेजवळ होती. उत्तम वक्तृत्त्वकला त्यांचेजवळ होती. अनेकांना मदत करण्याचा गुण तर त्यांचे वाडवडिलांकडून त्यांना मिळाला होता. नानासाहेब स्वत: शिक्षण घेत असताना स्वत:ची परिस्थिती बेताची असतानाही त्यांनी शेजारच्या गरीब परिस्थितीमुळे शिक्षण सोडू इच्छिणाऱ्या मुलाला शिकवून मॅट्रिकचे शिक्षण पूर्ण करण्यास मदत केली. पुढे तो विद्यार्थी मोठा कर्तृत्त्ववान झाला व त्याने नानांचे हे ऋण मोठ्या आदराने व प्रेमाने मान्य केले अशा अनेक आठवणी आहेत.'

नानासाहेब हे हाडाचे प्रेमळ शिक्षक, विद्यालंकृत, उत्तम प्रशासक, कुशल व शिस्तप्रिय अधिकारी होते. त्यांची विद्यार्थीदशेतील कामगिरी स्तिमित करणारी आहे. ते अतिशय हुषार व दीर्घोद्योगी होते. लखनऊ विद्यापीठातून इंग्रजी विषय घेऊन ते १९३८ साली एम.ए. झाले. पुढे बनारस विद्यापीठातून ते प्राविण्यासह बी.टी. उत्तीर्ण झाले. इंग्रजीत त्यांनी विशेष प्राविण्य मिळविले. १९३७-३८ मध्ये लखनऊ विद्यापीठाचे कुलगुरू रँग्लर परांजपे यांचे रीडर म्हणूनही त्यांनी काम पाहिले. १९३९ ते १९४६ या काळात ते अंमळनेर, मथुरा, उदयपूर तसेच पुण्यात नू.म.वि.मध्ये शिक्षक होते. त्याच काळात काही काळ ते मध्य प्रांतात राजपात्रित अधिकारी म्हणूनही कार्यरत होते. १९४६ ते १९६७ या काळात जबलपूर, अमरावती, बिलासपूर, रीवा, खांडवा, उज्जैन, भोपाळ येथे प्रथम प्राध्यापक व नंतर प्राचार्य अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या. अशा विविध जबाबदाऱ्या सांभाळून ते १९६९ मध्ये संयुक्त संचालक, लोकशिक्षण, भोपाळ येथून सेवानिवृत्त झाले.

सेवानिवृत्ती नंतरही त्यांनी विविध क्षेत्रात विशेषत: शिक्षणक्षेत्रात अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या. १९७० ते १९७४ या कालावधीत ते गांधी शिक्षण भवन, मुंबई या संस्थेत प्राचार्य होते. १९७४ ते १९७८ या कालावधीत सेंट टेरेसाज इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन, मुंबई येथे ते प्राचार्य होते.

या सर्व कालावधीत जसे त्यांनी अध्यापन केले तसेच त्यांचे अध्ययनही चालूच होते. त्यांच्या या व्यासंगाची परिणीती म्हणजे त्यांच्या संशोधनकार्यातही त्यांनी पी.एचडीसाठी प्रबंध केला, ज्याची फार वाखाणणी झाली. 'एज्युकेशनल डेव्हलपमेंट ऑफ मध्यप्रदेश (१८६१ ते १९४७)' हा प्रबंध त्यांच्या अखंड परिश्रमाचे फलित होय. पुढे जवळजवळ २० वर्षे त्यांनी पी.एचडीच्या विद्यार्थ्यांना गाईड म्हणून मार्गदर्शन केले. अनेक विद्यापीठात त्यांनी अध्ययन मंडळावरही काम केले. विद्यापीठातील कोर्ट, सेनेट, ॲकॅडमिक कौन्सिलचे सभासद म्हणून ते कार्यरत होते. मुंबई विद्यापीठात बोर्ड ऑफ स्टडीजचे अध्यक्ष होते. जबलपूर येथे कार्य कौन्सिलचे सभासद, परळ येथील गोखले शिक्षण महाविद्यालयात मानद प्राध्यापक होते.

शिक्षणक्षेत्रा खेरीज अन्य ठिकाणीही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. विदर्भ साहित्य संघाच्या जबलपूर येथील अधिवेशनाच्या स्वागत समितीचे ते उपाध्यक्ष होते.

निरनिराळ्या शैक्षणिक विषयांवर त्यांनी स्फुट लेखनही केले. वि.स.खांडेकरांच्या क्रौंचवध कादंबरीचा हिंदी अनुवाद त्यांनी केला. मध्यप्रदेश शासनाने 'मध्यप्रदेश का शैक्षिक इतिहास' या त्यांच्या प्रबंधाचे प्रकाशन केले.

या सर्व जीवन प्रवासात त्यांच्या सहधर्मचारिणी कमलाताई यांचीही मोलाची साथ त्यांना लाभली. कमलाताई तासगाव संस्थानचे विनायकराव पटवर्धन यांच्या कन्या. जुन्या काळातही त्यांचे शिक्षण बी.ए., बी.एड. व एम.ए., एम.एड. इतके झाले होते. मॅडम माँटेसरी यांचे हस्ते त्यांना माँटेसरी डिप्लोमाही मिळाला होता. मध्यप्रदेशच्या शिक्षण विभागात शासकीय, पूर्व प्राथमिक शिक्षण विद्यालयाचे प्राचार्यपद त्यांनी भूषविले. भोपाळच्या इंग्लिश लँग्वेज टीचिंग एज्युकेशन येथून त्या सहप्राध्यापिका म्हणून निवृत्त झाल्या. त्यांनी शिक्षणावर विशेष अभ्यास केला होता. त्यांचे 'पूर्व प्राथमिक शिक्षण' या विषयावर हिंदीतून पुस्तक प्रकाशित झाले असून ते मध्यप्रदेश शासनाने प्रसिध्द केले आहे.

अतिशय व्यासंगी, सुसंस्कृत आणि विद्योपासक असे डॉ. वामनरावांचे जीवन होते. त्यांचे सुहृदांनी त्यांच्या प्रेमळ, शिस्तप्रिय व परहितदक्ष स्वभावाबद्दल भरभरून लिहिले आहेच. 'होनहार बिरबानके होत चिकने पात' या उक्तीप्रमाणे त्यांचे चिरंजीव डॉ. सुभाष भावे यांनीही शिक्षणक्षेत्रात भरीव अशी कामगिरी केली आहे. वडिलांप्रमाणेच सुभाषरावही विद्याविभूषित आहेत. एम.ए., एल.एल.बी., एम.बी.ए. (अहमदाबादच्या विख्यात इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट या संस्थेतील पदवी) पी.एचडी व जर्नालिझमचा डिप्लोमा त्यांनी प्राप्त केला आहे.

पुणे येथील नारळकर व्यवस्थापन महाविद्यालयाचे ते संचालक होते. विविध विषयावरील त्यांची ग्रंथसंपदा विपुल आहे.

भावे मित्र मंडळाचे व त्यांचे प्रारंभापासून जिव्हाळ्याचे संबंध आहेत. भावे मित्र मंडळाच्या 'प्राजक्त'चेही ते संपादक होते. सध्या सुभाषरावांचे वास्तव्य पुणे येथे आहे.

**अशा कर्तृत्वसंपन्न मंडळींची कामगिरी भावे कुलबंधूंसाठी स्फूर्तीदायक ठरणारी आहे यात नवल ते काय!**


**संपर्क :** प्लॉट नं ९, सरगम, नवकेतन सोसायटी,
कोथरुड, पुणे ४११०३८ **भ्रमणध्वनी :** ७५५९४४४५२१

⌘⌘⌘

दि.१७ फेब्रुवारी २०२३ ला कोळथरे येथे श्रेयस भावे, यवतमाळ यांचे संकल्पनेतून भावे कुलबंधूंकडून महारुद्र श्री कोळेश्वराच्या चरणी अर्पण झाला. श्री. जयंत गंगाधर भावे (दापोली) यांनी महारुद्रासाठी सर्व व्यवस्था केली होती. या सोहळ्याचे फोटो येथे दिले आहेत.


















# कथा कोळेश्वराची

© चिन्मय अनिरुद्ध भावे, मुंबई.

**श्री कोळेश्वर विष्णुरुद्र विधी हा लोकत्रयीं वर्ततो**
**भक्तांचे निज पूर्ण काम करितो अब्धी तिरीं राहतो**
**ज्याचे नाम अर्धे हरी जड मुढां नामेंचि उद्धरी**
**गंगा वाहत मस्तकी निजवधू नामांकि जो सुंदरी।।**

मंदिराच्या सभामंडपात शांत बसलेलं असताना हे शब्द कानी पडले. श्री कोळेश्वर हे कौशिक गोत्री भावे मंडळींचे कुलदैवत. आमचं कोकणात घर नसल्याने कोळथरे गावात येणं हेच गावाला जाणं. अतिशय सुंदर समुद्र किनारा, एका बाजूला पंचनदीचे मुख आणि परिसरातील हिरवळ असा इथला टुमदार थाटमाट असतो.



परशुरामांनी सारी भूमी महर्षी कश्यपांना दान केल्यानंतर त्यांना आश्रमासाठी जमीन हवी होती. मठाला पुरेल इतकी जमीन त्यांनी सागराकडे मागितली. परंतु सागराने अतिशय गुर्मीत एक रेसभर जमीनही मिळणार नाही असे सांगितले. या उत्तराने क्रुद्ध झालेल्या श्री परशुरामांनी बाण मारून १०० योजने लांब आणि ६ योजने रुंद अशी जमीन मिळवली. बाण पडून घडलेली म्हणून इषुपातभूमी असे नाव तिला पडले. या भूमीच्या एका भागाला कोंकण असे नाव पडले. बागलाणातील साल्हेर किल्ल्यावरून हा बाण मारला अशी अनेकांची श्रद्धा आहे.

**कुकणाद् वर्धितम यस्माद् जातं तत् कोकणाभिदम्** – इथल्या भूमीच्या कणाकणाची मशागत करून, मेहनत करून हा प्रदेश शेतीला लागवडीला योग्य केला म्हणून त्याचे कोकण असे नाव पडले. उत्तरेकडून हिमालयातून विद्वान बुद्धिमान वेदांतवादरत, आचार संपन्न असे चौदा गोत्रांचे ब्राह्मण इथं आणले गेले आणि त्याला आर्यावर्त असे नाव दिले गेले.

**शास्त्र्या उत्तरतो याव त्साविञ्या सिंधुसंगमः**
**आर्यावर्तो नाम देशस्त्र मे चित्तपूरणम्** – गुहागर माहात्म्य

शास्त्री नदीच्या उत्तरेला ते सावित्री नदी जिथं सागराला मिळते त्यामधील प्रदेश म्हणजे आर्यावर्त. इथले विद्वान ब्राह्मण पाहून माझे चित्त प्रसन्न झाले, असं श्री परशुराम सांगतात आणि त्यांना चित्तपावन अशी संज्ञा देतात. अशा या कोकणभूमीत भ्रमंती करत असताना इथल्या शिवालयांचे दर्शन घेणे ही खास पर्वणीच असते. कारण प्रत्येक ठिकाणचा आसमंत निराळा, सौंदर्य निराळे.

**आख्यायिका** – इथं भातासाठी शेत नांगरत असताना एका कोळ्याला पाणी लाल झालेलं दिसलं, नांगराच्या फाळालाही रक्त लागले होते. या घटनेचा अर्थ न कळल्याने त्याने गाव गोळा केले परंतु कोणालाच काहीही लक्षात आले नाही आणि मग ते परत गेले. रात्री झोपेत या कोळ्याला भगवान शंकराने स्वप्नात येऊन दर्शन दिले आणि आपण प्रगट झाल्याचे सांगितले. कोळी सकाळी लवकर उठून गावकऱ्यांना घेऊन तिथेच गेला तेव्हा त्याला तिथं स्वयंभू शिवलिंग दिसले. तिथेच सर्वांनी साष्टांग नमस्कार करून छोटेसे शिवालय उभारले. कोळ्याचा ईश्वर म्हणजे कोळेश्वर या नावाने सर्व संबोधू लागले. या कोळी घराण्यातील व्यक्ती इथं बुरोंडीहून दर फाल्गुनमासी बळी घेऊन येते आणि ग्रामस्थ तिचा सन्मान करतात अशी नोंद मी देवालयाच्या पुस्तिकेत वाचली.

बर्वे, भावे, मोडक, कोल्हटकर, पिंपळखरे, लाटे, दातार, दातीर, भागवत, जोगदेव, जोगदंड, गद्रे, वाड, लागू आणि बाम या कुटुंबांचे कोळेश्वर हे कुलदैवत. इथले मूळ देवस्थान किमान पाचशे वर्षे तरी जुने असावे असा अंदाज बांधला जातो. शके १४३० (इसवी सन १५०८) च्या सुमारास लिहिल्या गेलेल्या सीताराम भट्ट जोशी यांचेकडील ग्रंथात प्रत्येक पानावर श्री कोळेश्वर अशी नोंद आहे.

आंजर्ले येथील नारायणराव निजसुरे यांच्या संग्रही असलेल्या स्कंद पुराणातील परशुराम खंडात ५५ लेखी अध्याय सापडला त्यात श्री परशुरामांनी स्थापन केलेल्या देवतांचा उल्लेख आहे.

**संस्थापयामास, तथा देवं हरिहरेश्वरं**
**तथाच भैरवं देवं कोळेशं पार्वती तथा।।**

या उल्लेखाप्रमाणे कोळेश्वर देवता पुराणकालीन आहे असे मानायला जागा आहे. कोळेश्वर हा त्रिगुणात्मक देव आहे म्हणजे यात ब्रह्मा विष्णू महेश ही तिन्ही तत्त्वे आहेत.

जवळच असलेल्या पंचनदी गावातील श्री. जोशी हे कोळेश्वराचे मोठे भक्त होते आणि त्यांनी इसवी सन १८३७ च्या सुमारास मंदिर बांधायला सुरुवात केली असे दिसते. पुढे लष्करात असलेल्या लाटे (मूळ आडनाव भागवत) यांनी पुढचा भाग बांधला असे लक्षात येते. उत्तर मध्ययुगीन - पेशवेकालीन मराठा शैलीत हे बांधकाम असून मंदिराच्या घुमटांची शैली इस्लामी वास्तुरचनेकडे झुकलेली आहे.


हे बांधकाम इसवीसन १८६० मध्ये पूर्ण झाले असावे. इथे जवळच जाखाई काळेश्रीचे देऊळ आहे. तसेच विष्णू-लक्ष्मी, श्री गणेश आणि हनुमानाची देवळेही इथं आहेत. मंदिराला पाच फूट जाड चिरेबंदी जांभ्याची तटबंदी असून जवळच दगडी पुष्करिणी सुद्धा आहे.

मंदिराच्या बाजूला एक ओढा आहे आणि परिसरातील झाडांची शीतल छाया इथं चालताना अनुभवायला मिळते. कोळथरे हे गाव अगदी शांत आणि रम्य आहे. समुद्राला समांतर घरांची रांग, नारळ सुपारीच्या बागा आणि भातशेती असं इथलं चित्र असतं.

अनेकदा तुझं मूळ गाव कोणतं हा प्रश्न विचारला जातो आम्हाला गाव नाही असं मी सांगायचो! लहानपणी काकाकडे पुण्याला नाहीतर आजोळी बडोद्याला जाणे हाच नेम. पण कुलदैवत कोळेश्वर रत्नागिरी जिल्ह्यात कोळथऱ्याला. तिथं ९-१० वर्षांचा असताना गेलो होतो ते गाव अगदी चित्रातल्या सुरेख गावासारखं वाटलं होतं. काही शब्द आणि काही चित्रं यांची सांगड लहानपणीच अशी एकत्र घातली जाते की त्यांना वेगळं करणं शक्य होत नाही. नुकताच पुन्हा कोळथरेला जाण्याचा योग आला, माझी एकंदर सातवी खेप असेल इथं खूप काही बदललं नाही आहे पण दापोली आणि दाभोळच्या मध्ये हे गाव बुरोंडीच्या पुढं मुख्य रस्त्यापासून खाली समुद्रावर वसलेलं अगदी छोटंसं पण अठरापगड घरांचं. आगोम आयुर्वेदिक कंपनी इथलीच, इथं उर्दू शाळाही आहे आणि एक सुंदर समुद्रकिनारा आणि पंचनदी नावाची छोटीशी नदी जिथं समुद्राला मिळते तिथं हिरवाई निळाई पाहत रेंगाळत राहावंसं वाटतं.

⌘⌘⌘

**संपर्क :** ३१-५२, कॅडेल, कल्पतरू ऑरा,
घाटकोपर (प), मुंबई ४०००८६ **भ्रमणध्वनी** - ९९३०८४००७४




**कै. उमा गंगाधर भावे** यांच्या आठवणीतील कवितांचा संग्रह **'काव्यउमा'** चा प्रकाशन समारंभ गुरुप्रसाद पावसकर यांचे हस्ते कोदाळ, सत्तरी, गोवा येथील चिदंबर मंदिराच्या प्रांगणात झाला. उमा भावे यांची नात सौ. विजेता भावे – जोशी यांनी बालपणापासून या कविता संकलित केल्या होत्या. या कार्यक्रमाला चित्रकार शिवानंद खेडेकर, कदंब मंडळाचे व्यवस्थापक संजय घाटे, आंबेडेचे पंच राजेंद्र अभ्यंकर, नगरगाव सरपंच सौ. संध्या खाडिलकर, किशोर भावे, दत्तप्रसाद ओक, दत्तात्रेय भावे, पंच उर्मिला गवस आदींची उपस्थिती होती. या पुस्तकात पाळणा गीते, लग्न गीते इत्यादी कवितांचा समावेश आहे. पुस्तकात त्यांचा मुलगा दत्तात्रेय गंगाधर भावे यांची प्रस्तावना व विजेता भावे – जोशी यांच्या मनोगता बरोबरच मुलगा वासुदेव गंगाधर भावे, सूना वसुधा वासुदेव भावे व माधुरी दत्तात्रेय भावे, मुली सविता दिनकर जोशी व राजश्री रमण दामले, भाचे चित्तरंजन वामन फडके, शरद विष्णु वझे, केशव वामन जोशी व विनायक वासुदेव वझे, पुतण्या रवी श्रीपाद भावे यांनी उमा भावे यांच्या विषयीच्या आपल्या आठवणींना उजाळा दिला आहे.




प्रकाशन समारंभानंतर दत्तात्रेय भावे यांच्या शिष्यांनी 'गंध फुलांचा' हा संगीताचा कार्यक्रम सादर केला. हे सर्व शिष्य म्हणजे पुण्यातील बालकल्याण संस्थेतील दिव्यांग मुले होत. या मुलांनी भावगीते, भक्तीगीते, अभंग, सनई वादन, तबला वादन सादर केले. साथीला संवादिनीवर दत्तात्रेय भावे होते.

**भावे मित्र मंडळातर्फे सर्वांचे हार्दिक अभिनंदन!!!**




रोटरी क्लब स्पोर्ट सिटीच्या वतीने विशेष विद्यार्थ्यांना संगीत शिकवणारे **दत्तात्रय गंगाधर भावे** यांना व्यावसायिक गुणवत्ता (व्होकेशनल एक्सलंस-वेरा) पुरस्कार डॉ. रजनीताई इंदुलकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. बालकल्याण संस्था गणेशखिंड मार्ग येथील सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी रोटरी क्लब स्पोर्टसिटीचे अध्यक्ष सॅम्युअल केनेडी, सचिव भुपेंदर शेठी आदी मान्यवरांच्या बरोबरच रोटरी सदस्य, विशेष मुले मुली व पालक उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. रजनीताई इंदुलकर यांनी, 'पूर्वी खेळ व संगीत याला दुय्यम मानले जावून प्रोत्साहन मिळत नसे, मात्र आता नुसते प्रोत्साहनच नाही तर ते उदरनिर्वाहाचे साधन सुद्धा बनले आहे, हे स्वागतार्ह आहे.' असे संगितले. या कार्यक्रमात विशेष मुलांनी उत्तम गायन वादन सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

**जानेवारी २०१७ मध्ये नागपूरला झालेल्या भावे मित्र मंडळाच्या संमेलनात कुलभूषण पुरस्कार देऊन दत्तात्रेय भावे यांचा गौरव केला होता.**

**भावे मित्र मंडळातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!!!**




दि. १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी फिजी देशात विश्व हिंदी संमेलनात 'भारतीय भाषाई संबंध तथा अनुवाद' या विषयावर प्रपत्र सादर करताना **डॉ. भूषण विठ्ठल भावे, गोवा.**

**भावे मित्र मंडळातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!!!**

# छंद माझा वेगळा

© अविनाश रामचंद्र भावे, बडोदा.

शीर्षक पाहुन आश्चर्य वाटेल, दूरदर्शन मालिकेसारखे नाव वाटते. पण तसे नाही. आपण तीस पस्तीस वर्षे नोकरी करतो, नोकरीमध्ये काही वेळा उसंत मिळत नाही कित्येक वेळा कंटाळून नोकरी सोडून द्यावी असे क्षणभर वाटु शकते. घाणीला बांधलेल्या बैलासारखी उपमा अवास्तव वाटेल परंतु वस्तुस्थिती थोडी फार तशीच असते.

एका दिवसात चित्र पालटते. कालचक्र थांबले असा भास होतो. आजपासून कामावर जाणे बंद. निवृत्ती काळ सुरू झाला. आठ दिवस फंड, रजेचे पैसे वगैरेमध्ये वेळ जातो. आरामाचा आनंद होतो. हळूहळू सगळे थांबते. आपल्या बरोबर काम करणारे भेटणे बंद होतात. जुनी काही राहिलेली कामे पूर्ण होतात. हाताखाली काम करणारे पण भेटत नाहीत. वेळ कसा घालवावा हा प्रश्न भेडसावू लागतो. पूर्वी वर्तमानपत्र पाच मिनिटे वाचत असू आता अर्धा तास वाचतो.

आपण अठ्ठावन्न ते पासष्ट वर्ष वयोगटाचा विचार करतो आहोत.

मी विचार केला, मंथन केले. नंतर कॉम्प्युटर शिक्षणाचा वर्ग चालू केला. तीन महिने अभ्यास केला. त्यावेळी घरी कॉम्प्युटर, मोबाईल फोन नव्हते. कॉम्प्युटर शिक्षणाचा उपयोग कमी झाला. पण नंतर फायदा झाला.

मला वाटते आपण स्वत:ला कोणत्या तरी प्रवृत्तीत गुंतवून घेणे जरूरीचे आहे. मला गाता येत नाही पण आवड आहे. शिकण्याचा प्रयत्न करावा. स्पर्धेत भाग घ्यावा. छोटेखानी स्पर्धा ज्येष्ठ नागरिक संघ याच यासाठीच असतात. थोडे दिवस अभ्यास करण्यात वेळ चांगला जातो. समवयस्कांच्या ओळखी होतात. जिंकणे हरणे बाजूला राहू द्यावे. वेळ छान जातो हे महत्त्वाचे आहे.

काही वेळा वयस्कर लोकांसाठी कार्यक्रम, स्पर्धा आयोजित केल्या जातात तयारीमध्ये चांगला वेळ जातो. अभ्यासात अनुभव येतात. मग आत्मपरीक्षण करणे ओघाओघाने आलेच.

माझा स्वत:चा अनुभव. मला शास्त्रीय संगीताची आवड विशेषत: बासरीची. पण नोकरी विद्युत इंजिनियरची त्यामुळे शास्त्रीय संगीत आणि बासरी शिकणे अवघड काम होते. रजा मिळणे कठीण होते. शाळेमध्ये थोडा अभ्यास झाला होता. निवृत्तीनंतर अभ्यास चालू केला. निरनिराळे शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम ऐकले. संगीत सरिता कार्यक्रम गुरुस्थानी ठेवून काही गोष्टी लिहून घेणे, अभ्यास करणे चालू केले. सवाई गंधर्व हा कार्यक्रम तीन चार वेळा ऐकला. त्यावेळी वेळेचे बंधन नव्हते. ऐकणे मनन करणे. पुष्कळ शिकावयास मिळाले.

बासरीची पदवी परिक्षा उत्तीर्ण केली ती निवृत्तीनंतर काही वर्षांनी.

फेसबुक वर पाहताना चिन्मय मिशन, पुणे येथे आठ दिवसांचे वर्ग गुरू शिष्य परंपरेनुसार होत असल्याचे पाहिले. पूर्ण दिवस संगीत व थोडे अध्यात्मिक ज्ञान असा कार्यक्रम होता. तीन वेळा तेथे शिक्षण घेतले. छान अनुभव आणि शिक्षण सहाध्यायींकडून पुष्कळ ज्ञान मिळाले.

थोडी साहित्याची आवड होती. साहित्य संमेलन, कविता लेखन पुस्तके मासिके वाचनात चांगला वेळ घालवू शकलो. काय पदरी पडणे पेक्षा वेळ चांगला जाणे महत्त्वाचे होते.

पु. ल. देशपांडे यांनी सांगितल्याप्रमाणे जीवनात भरण पोषणा शिवाय एखादी कला अवगत करणे आयुष्याच्या उत्तरार्धात उपयोगी पडते हे अगदी सत्य आहे. मानसिक समाधान मिळू शकते.

आपले आणि साथीदारांचे शरीर चांगले रहाणे तितकेच महत्त्वाचे आहे. आपल्या नातेवाईकांवर भार पडू नये यासाठी काळजी घेणे आवश्यक आहे.

आपली कला दुसऱ्यांना शिकवण्याने आनंद द्विगुणीत होतो. फक्त उगीच सल्ला देऊ नये नाहीतर आपल्या वाटेस कोणी येणार नाही. हे मलाही लागू पडते.

प्रयत्ने वाळूचे कण रगडता तेलहि गळे असे म्हणतात. मित्रांनो हे ब्रह्मज्ञान कसे वाटले. अर्थात हे लिहिण्यात माझा वेळ छान गेला हे ही नसे थोडके.

⌘⌘⌘

**संपर्क :** ८ ए, गोकुळ को-ऑप. सोसायटी, प्रतापनगर, बडोदा ३९०००४ **भ्रमणध्वनी :** ९३२७५१५६१४

**'भावे-प्रयोग'मध्ये द्यायच्या जाहिरातींचे दर**

**पाव पान रु. ५,००/- अर्धे पान रु. १,०००/- पूर्ण पान रु २,०००/-**
**संपूर्ण अंक प्रायोजकत्त्वाचे रु. १०,०००/-**
रंगीत आवृत्तीचे दर दुप्पट राहतील.
**आपल्या व्यवसायाची जाहिरात भावे-प्रयोगमध्ये जरूर द्यावी ही विनंती.**

**आवाहन** सर्व भावे कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना विनंती की, त्यांनी आपल्या कुटुंबियांपैकी कोणाचेही विशेष प्राविण्य, सत्कार, गौरव, वाढदिवस अथवा महत्त्वाच्या पदावर नियुक्ती इत्यादी प्रकारची कोणतीही महत्त्वाची घटना त्या प्रसंगाच्या फोटोसह bhave1956@gmail.com या मेलवर पाठवावी, किंवा अभय शंकर भावे यांना ९४२२३०६०३३ या भ्रमणध्वनीवर Whats App वर पाठवावी म्हणजे त्याचे वृत्त पुढील अंकात समाविष्ट करता येईल. अशा वृत्तांमुळे आपल्या आनंदात सर्वच भावे कुलबंधू, भगिनी व माहेरवाशिणींना सहभागी होता येईल.

'भावे-प्रयोग' हा प्राजक्तचा अंक सर्व भाव्यांना व माहेरवाशिणींना कोणतीही वर्गणी न घेता पाठवला जातो. अंक पाठविण्याचा संमेलनाची वर्गणी, आजीव सदस्यत्त्व किंवा स्वनिधीला दिलेली रक्कम याचेशी कोणताही संबंध नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. म्हणजेच आपण सदस्यत्त्व, स्वनिधीची रक्कम द्यावीच, पण 'भावे-प्रयोग' हा प्राजक्तचा अंक आला नाही तरी जरूर कळवावे. अंक शिल्लक असल्यास नक्की पाठविला जाईल. आपला बदललेला पत्ता, फोन नंबर व मेल ॲड्रेस खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवावा किंवा फोनवर कळवावा, म्हणजे सर्व मेलिंग लिस्टमधे तो अद्ययावत होईल. 'भावे-प्रयोग'या भावे मित्र मंडळाच्या प्राजक्तच्या अंकासाठी साहित्यही या पत्त्यावर पाठवावे. **भावे मित्र मंडळ, १२४४, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.**

# भावे मित्र मंडळ, एक परिवाराचा सदस्यत्त्व आणि स्वनिधीचा उपक्रम.

**'भावे मित्र मंडळ-एक परिवार'** ही संस्था २००६ मध्ये नोंदणीकृत झाली असून संस्थेचे सदस्य होण्यासाठी १८ वर्षांवरील सर्व कौशिक गोत्री चित्पावन भाव्यांनी मंडळाचे सदस्यत्व स्वीकारावे असे आवाहन भावे मित्र मंडळाकडून वेळोवेळी केलेले आहे. याला प्रतिसाद म्हणून अनेकांनी अगदी लहानग्या मुलांसह सदस्यत्व स्वीकारले आहे. **डिसेंबर २०१८ मध्ये उज्जैनला झालेल्या संमेलनातील निर्णयामुळे सदस्यत्त्वाची रक्कम आता एक हजार रुपये झाली आहे.**

जुलै, २००८ मध्ये झालेल्या भावे मित्र मंडळाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत भावे मित्र मंडळाचे कार्य पुढे नेण्यासाठी संस्थेचे सदस्य वाढविणे व स्वनिधी वाढविण्याबाबत खालील निर्णय झाले. १) शिक्षण व तत्सम सहकार्य, २) व्यावसायिक सहकार्य/ व्यवसायाकरिता कमी व्याजदरात भांडवल पुरविणे ३) वैद्यकीय कारणांसाठी सहकार्य, मोठ्या शस्त्रक्रियेसाठी मदत (परत बोलीच्या तत्वावर) ४) आपत्कालीन सहकार्य अशा कारणांसाठी आणि भावे मित्र मंडळाच्या कार्यालयीन व्यवस्थापनासाठी स्वनिधी जमवावा असे ठरले. **प्रत्येक कमावत्या व्यक्तीने रु. ५०००/- स्वनिधीसाठी द्यावेत** असे आवाहन केले गेले. यापेक्षा अधिक रक्कम दिल्यास स्वागतच आहे असेही आवाहन कार्यकारिणीने केले होते. त्यानुसार अनेकांनी स्वनिधीसाठी भरघोस निधी देऊन चांगला प्रतिसाद दिला. अनेकांनी एक रकमी रु.५०००/- देण्यास असमर्थता दर्शवल्याने रक्कम हप्त्याने स्वीकारण्याचीही योजना समोर आली.

भावे मित्र मंडळाचे अध्यक्ष, श्रीवर्धन वामन भावे यांनी प्रत्येक भावे कुटुंबाकडून रु. १०००/-(रु. एक हजार फक्त) वार्षिक वर्गणी दरवर्षी घ्यावी असा प्रस्ताव ठेवला. या प्रस्तावाला अभय शंकर भावे यांनी अनुमोदन दिले. कुलबंधूंचे उपलब्ध असलेले संपर्क पाहता तीन हजारांपेक्षा अधिक कमावत्या व्यक्ती आहेत. **या आवाहनास मान देऊन अनेकांनी सदस्यत्त्व स्वीकारले आहे, तसेच स्वनिधीही दिलेला आहे.**

**आपणही सदस्यत्त्वाची रक्कम रुपये एक हजार व वार्षिक वर्गणी रुपये एक हजार देऊ शकता किंवा खाली दिलेल्या बँक अकाऊंटमध्ये रक्कम ट्रान्सफर करावी अशी विनंती आहे.**

**बँकेचे डिटेल्स याप्रमाणे आहेत. Bank Name** - IDBI Bank, **Branch** - Deccan Gymkhana, Pune. **Account Name** - Bhave Mitra Mandal, **Saving A/C Number** - 50210010010723, **IFSC** - IBKL0000502. **रक्कम ट्रान्सफर केल्यावर अभय शंकर भावे यांना ९४२२३०६०३३ या क्रमांकावर किंवा** bhave1956@gmail.com **या मेलवर संपूर्ण नाव व पत्यासह कळवावे म्हणजे पावती मेलने पाठवता येईल.**

# भावे मित्र मंडळाचा एक उपक्रम - भावे शिक्षण निधी

भावे मित्र मंडळाच्या बैठकीत शिक्षण निधीच्या वाढीसंबंधी काय करता येईल याबद्दल नेहमीच विचार विनिमय चालू असतो.

पहिला कुलवृत्तांत सन १९४० मध्ये प्रकाशित झाला. त्यानिमित्ताने जो निधी शिल्लक उरला होता, त्या रकमेचा विनियोग कसा करावा या कल्पनेतून भावे शिक्षण निधीचा विचार पुढे आला. अनेक कुलबंधूंचे पाठिंब्याने 'भावे शिक्षण निधी'ची स्थापना झाली. जवळजवळ सत्तर वर्षे हे कार्य पहिला कुलवृत्तांतकर्ते गोविंद वासुदेव भावे व त्यांचे सहकारी, पुढे त्यांचे चिरंजीव मधुसूदन गोविंद भावे यांनी चालवले. भावे मित्र मंडळाची स्थापना झाल्यावर २००८ साली भावे शिक्षण निधी हा भावे मित्र मंडळात समाविष्ट झाला. त्यानंतर कामास थोडा वेग आला. आता मंडळाच्या त्रैमासिकातून दरवर्षी निवेदन दिले जाते व भावे कुलोत्पन्न गुणवान विद्यार्थ्यांना पुरस्कार, गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. असे असले तरी अजून मोठ्या प्रमाणात या निधीमध्ये भर पडल्यास, वाढत्या महागाईच्या काळात वाढलेल्या शिक्षण खर्चाची तोंडमिळवणी करणे शक्य होईल.

भावे शिक्षण निधीतून आजवर अनेक विद्यार्थ्यांना मदत मिळाली आहे. ही मदत 'फूल ना फुलाची पाकळी' अशा स्वरूपाची आहे हे मान्य केले तरी विद्यार्थ्यांना त्या त्या वेळी जी मदत झाली आहे त्याबद्दल अनेकांना कृतज्ञता वाटते व ते स्वाभाविकही आहे. ही मदत थोडी असली तरी आपल्या कुलाने प्रेमाने व आपुलकीने दिलेला तो प्रोत्साहनपर आशिर्वाद आहे ही भावना अनेक कुलबंधूंशी बोलताना लक्षात आली.

**ही भावना लक्षात घेता ज्या भावे कुल बंधू भगिनींना अशी मदत अल्पस्वल्पही का असेना, मिळाली आहे त्यांचेसाठी विनंती वजा आवाहन करीत आहोत की आता जे कुलबंधू आर्थिकदृष्ट्या स्थिरावले आहेत त्यांनी 'भावे शिक्षण निधी'स सहाय्य करून हा निधी वाढवण्याचे कामी पुढाकार घ्यावा. एक कल्पना अशी आहे की प्रत्येकाने दरवर्षीची योजना निश्चित करून तशी रक्कम तयार ठेवून ही रक्कम 'भावे शिक्षण निधी'स देणगीचे स्वरूपात द्यावी. आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने, लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने किंवा भावे मित्र मंडळाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्तानेही अशी योजना आपणास तयार करता येईल.**

अर्थात ज्यांनी विद्यार्थीदशेत या निधीतून काही सहाय्य घेतलेले नाही अशांनीही शिक्षण निधीस सहाय्य करण्यासाठी हे निवेदन आहे हे सांगणे नकोच. 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे हा निधी वाढीला लागेल असा विश्वास वाटतो. सर्वांनी मनावर घेतले तर हे काम सोपे होईल. 'केल्याने होत आहे रे ! आधी केलेचि पाहिजे !' अधिक काय लिहावे!

**अध्यक्ष, भावे मित्र मंडळ**

**शिक्षण निधीच्या देणगीची रक्कम आपल्याला बँकेच्या खात्यात डायरेक्ट जमा करता येईल. त्याचा तपशील खाली दिला आहे.**

**Bank Name** - Janata Sahakari Bank, **Branch** - Karve Road, Pune., **Account Name** - Bhave Mitra Mandal (Ek Pariwar) A/C Bhave Shikshan Nidhi, **Saving - A/C Number** - 007220100038846, **IFSC Code** - JSBP0000007

**रक्कम ट्रान्सफर केल्यावर पर्शराम भावे (९४०३५१६८७५) किंवा अभय भावे (९४२२३०६०३३) यांना कळविणे आवश्यक आहे.**

# 'सुवर्णी' सोनमोहर आणि रुद्रपलाश - एक 'भडक' आकर्षण

© डॉ. सरिता विनय भावे, मुंबई.
छायाचित्रे – विनय भावे, मुंबई.

## 'सुवर्णी' सोनमोहर

मे महिन्याच्या रणरणत्या उन्हात काळपट गर्द हिरव्या पर्णसंभाराने सुखावणारा, विपुल फुलांनी सजलेला, हमखास लक्ष वेधून घेणारा वृक्ष म्हणजे 'सोनमोहर'. नावावरूनच या झाडाची फुले सोनपिवळी असतील आणि ते गुलमोहर या वृक्षाच्या प्रजातीतले असेल याची कल्पना येते. हा मूळचा अंदमान, विषुववृत्तीय आग्नेय आशियातील देशांचा (श्रीलंका, मलेशिया, इंडोनेशिया, थायलंड इ.) आणि उत्तर ऑस्ट्रेलियाचा रहिवासी. पण आता बरीच वर्षं आपल्याकडे स्थिरावला आहे. भारतात याचे आगमन आग्नेय आशियातील देशांतून प्रथम तामिळनाडू आणि आंध्रप्रदेश येथे झाले होते.





वनस्पतीशास्त्रात याला *Peltophorum pterocarpum* हे नाव प्राप्त झाले आहे. भरगच्च पिवळ्याधमक फुलोऱ्यामुळे याला इंग्रजी भाषेत 'यलो फ्लेम ट्री', 'यलो फ्लॅमबॉयन्ट', 'यलो पोईनसियाना'असे नावाजले जाते. याची पाने गुलमोहरासारखी असल्याने हिंदीत याला 'पीला गुलमोहर' असे सुद्धा म्हणतात. याच कारणामुळे आपण त्याचे 'ऑस्ट्रेलियन गुलमोहर' आणि सोनेरी फुलांमुळे 'सोनमोहर' असे मराठी नामकरण केले आहे. एखादी हौशी नगरपालिका, रस्त्याच्या कडेला सावलीसाठी आणि शोभेसाठी, गुलमोहराच्या झाडांबरोबर आलटून पालटून यांची लागवड करते आणि बहराच्या दिवसात लाल आणि पिवळ्या फुलांच्या 'हळदी-कुंकवाची' मेजवानी जनतेच्या वाट्याला आल्याने त्यांच्या कौतुकास पात्र ठरते!

हा पानगळीचा वृक्ष असला तरी फारच थोडा काळ निष्पर्ण राहत असल्याने वर्षभर सदाहरीतच वाटतो. झाड उंच, भरगच्च आणि डेरेदार असते. खोडाची साल खवल्याखवल्यांसारखी असते. झावळ्यांसारख्या पानांना असलेल्या पर्णिकांची रचना द्विसंयुक्त पद्धतीची असते. मार्च ते मे आणि सप्टेंबर ते डिसेंबर असा वर्षातून दोन वेळा हा वृक्ष बहरतो. बहराच्या काळात तांबूस-तपकिरी, वाटोळ्या कळ्यांचे तुरे उमलतात आणि त्यातून पिवळीजर्द, क्रेपच्या कागदासारख्या पाच पाकळ्यांची, भरपूर पुंकेसर असलेली, मंद गंधाची फुले बाहेर येतात. तुऱ्यातील फुले खालून वर अशी उमलत जातात. हळूहळू सगळे झाड पानोपानी सुवर्ण पुष्पसंभार मिरवू लागते. कालांतराने झाडाच्या अंगांगावर पिवळी फुले आणि तळाशी गळून पडलेल्या पिवळ्या फुलांची पखरण असे मनोहारी दृश्य दिसायला लागते. विशेषत: उद्यानांमध्ये सावलीसाठी लावलेल्या या झाडाच्या पिवळ्या फुलांचा सडा उद्यानाच्या हिरव्या तृणांच्या गालीचावर निरतिशय मनमोहक वाटतो आणि समस्त पुष्परसिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरतो.

फुलांचा बहर ओसरल्यावर झाडाला येणाऱ्या शेंगा तांब्याच्या रंगाच्या असतात, म्हणून या झाडाला इंग्रजीत 'कॉपरपॉड' आणि मराठीत 'ताम्रशिंबी' म्हणतात. अशी नुसती अगणित शेंगा लटकलेली झाडेही मस्त दिसतात! झाडावरून खाली रस्त्यावर पडलेल्या शेंगांमधील मण्यांसारख्या बिया उन्हाने वितळलेल्या डांबरात रुतून टचटचीत दिसतात (त्यांना तसे बघणे मजेशीर वाटले तरी रस्ता खराब होतो, हे ही खरे!). जळणासाठी, हलक्या बांधकामात आणि कॅबिनेट बनवण्यासाठी लाकडाचा आणि चारा म्हणून याच्या पानांचा उपयोग होतो. 'बाटीक' प्रकारातील कापडाच्या रंगकामात वापरला जाणारा विशिष्ट पिवळट तपकिरी रंग खोडापासून काढतात. सूज, मुकामार, जखमा बऱ्या करण्यासाठी, वेदनाशामक म्हणून याचा अर्क गुणकारी असतो. असा आहे हा हिरवी पाने, तांबूस कळ्या, पिवळी फुले, तांबूस शेंगा अशा उठावदार रंगसंगतीची निसर्गाने लयलूट केलेला आणि उपयुक्त असणारा सोनमोहर!

## रुद्रपलाश – एक 'भडक' आकर्षण!

अणुशक्तीनगरच्या वळणदार रस्त्यांवरून फेरफटका मारताना जमिनीतून हिरवे कारंजेच वरती आले आहे असा भास होणारे आणि भगव्या रंगाची जरा भडकच म्हणावी अशी लहान पेल्याच्या आकाराची फुले असणारे झाड पाहून मला नेहमी खुद्कन हसू येते! 'मनोजवम् मारुततूल्य वेगम्' या उक्तीनुसार मन थेट २५ वर्षं मागे, पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या प्रांगणात येऊन पोचते. तिथल्या माळीदादांना या झाडाकडे निर्देश करून त्याचे नाव विचारल्याचा प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा उभा राहतो. याच माळीदादांनी 'बहावा'चं 'भाव्या' केलेलं असल्याने मी जरा साशंकच होते. तरीही हिय्या करून मी माझा प्रश्न विचारला होता. माळीदादांनी त्यांच्या नेहमीच्या उत्साहाने 'ह्यो व्हय ?'....ह्यो पिथुरड्या', असं सांगून माझी रजा घेतली होती. मला मात्र इतक्या दिमाखदार झाडाचे एवढे कठोर नाव ऐकून झीट यायचीच बाकी होती! 'भाव्या' परवडलं

यापेक्षा! माझ्या अज्ञानाचे निराकरण न होता त्यात अजून गोंधळाची भर पडल्याने, मी जमिनीवर पडलेले एक फूल उचलून, वनस्पतीशास्त्र विभागातील तज्ज्ञ मंडळींना विचारून, माझ्यापुरते त्याचे नव्याने 'बारसे' करून घेतले....तो होता 'स्पॅथोडिया' (माळीदादांना पुन्हा एकदा मनोमन सलाम....इंग्रजी आणि मराठी नावातील 'समान नादमयता' सांभाळल्याबद्दल!).

मूळच्या आफ्रिकेतील असलेल्या या झाडाला मराठीत 'आकाश शेवगा', हिंदीत 'रगतूरा' आणि 'नंदी फूल (अथवा नंदी फ्लेम)' ही फारशी प्रचलित नसलेली नावे असली तरी बंगालीत अतिशय समर्पक 'रुद्रपलाश' असे याचे नाव आहे. याची फुले आपल्या पळसाशी साधर्म्य असणारी पण त्याच्या पेक्षा जास्त भगभगीत रंग असणारी आहेत. 'बिगोनिएसी' या जातकुळीत 'स्पॅथोडिया कॅम्पानुलाटा' (*Spathodea campanulata*) हा एकमेव वृक्ष आहे. Campanula म्हणजे bell किंवा घंटी किंवा उलटा कप म्हणा हवं तर, अशी त्याच्या फुलांवरून त्याला मिळालेल्या शास्त्रीय नावाची संगती आपल्याला लावता येते.





गर्द हिरव्या, चकाकणाऱ्या, लंबवर्तुळाकार पानांची 'संयुक्तपर्णी' रचना असणारा हा वृक्ष तसा नजरेत भरणारा आहे. मध्यम उंची आणि फार वेड्यावाकड्या न पसरणाऱ्या फांद्यांमुळे हा 'सुबक'च दिसतो. त्यातून त्याच्या पानांशी उठावदार रंगसंगती साधणाऱ्या, झगझगीत गर्द केशरी, शेंदरी अथवा नारंगी रंगाच्या, जरा कठोरच भासणाऱ्या फुलांनी ते पूर्ण खुलून आल्यावर मात्र भरजरी वस्त्रप्रावरणे ल्यालेल्या, मौल्यवान अलंकारांनी मढलेल्या, एखाद्या रूपगर्वितेसारखे आपल्याच सौंदर्याच्या कैफात ते डोलत राहते. असे ताजेतवाने करणारे याचे घनदाट लावण्य डोळ्यांचे पारणेच फेडते. म्हणूनच तर जगभर घरासमोरच्या बागा, उद्याने, रस्त्याच्या कडेला 'शोभिवंत वृक्ष' म्हणून याची लागवड केली जाते. फुलांचा रंग तर ओसंडून वाहतोय असेच भासत राहते आणि हाताला, कपड्यांना पिवळसर, नारंगी डाग पडल्यावर तो 'भास' नाही हे जाणवते! भगवा, केशरी रंग तयार करण्यासाठी या फुलांचा उपयोग होतो यात काहीच नवल नाही!

याच्या शेंदरी फुलांवर सोनेरी छटा असून त्यावर नाजुक, लालसर रेघा असतात. संपूर्ण फुलाच्या टोकाला असलेली पिवळी किनार अगदी उठून दिसते. मध्यभागी असलेल्या चार केशरी पुंकेसरावर असलेले तपकिरी परगकोश सगळ्याच फुलाला एकाचवेळी रंगांचा समतोल आणि आकर्षकता बहाल करतात आणि त्यांच्यातील नाजुकपणा आणि सुगंधाची कमतरता आपल्याला विसरायला भाग पाडतात. चुण्याचुण्या असलेल्या, कातरलेल्या, झालरीच्या पाच पाकळ्यांनी कपाच्या आकाराचे फूल बनवले आहे असे वाटते. त्या पेल्यात दवबिंदूंचे अथवा पावसाचे पाणी जमा होऊन पोपट, साळुंकी यासारखे पक्षी ते पाणी पीत असल्याचे मनोहारी दृश्यही कधी कधी नजरेस पडते.

कळ्यांचे रूप तर काय वर्णावे?! फांदीच्या टोकाला हिरवट-तपकिरी-पिवळ्या (ऑलिव्ह ग्रीन) रंगाच्या, मखमली ७-८ चंद्रकोरीच एकमेकांना खेटून, वर्तुळाकार रचून ठेवल्या आहेत असे भासते. जर त्यांना करंज्यांची उपमा दिली तर त्यांची रचना 'खुमासदार' आहे असे म्हणता येईल! अर्धवट उमललेली कळी 'ट्यूलिप'च्या फुलांसारखी दिसते म्हणून या झाडाचे 'आफ्रिकन ट्यूलिप ट्री' असेही सार्थ नाव आहे. मिटलेल्या कळ्या लाल रंगाच्या पाण्याने टचटचीत भरलेल्या असतात, त्यामुळे लहान मुलांना हे रंगीत पाणी 'पिचकारी' सारखे उडवायला खूप मजा वाटते. जगभरातील लहान मुले इथून तिथून सारखीच! यामुळे याला 'स्कर्ट ट्री' (squirt म्हणजे पिचकारी अथवा चिळकांडीसारखे उडवणे) असेही नावाजले जाते.

या झाडाला वर्षभर जरी फुले येत असली तरी वसंतऋतु हा खरा बहराचा हंगाम! बहर ओसरल्यावर याला हिरवट-तपकिरी रंगाच्या बोटांसारख्या दिसणाऱ्या शेंगा येतात. त्यात साधारणत: ५०० कागदी बिया असतात. हलक्या असल्यामुळे वाऱ्याने सहजपणे त्यांचा फैलाव होऊन पुढील सृजन व्हावे अशी व्यवस्था निसर्गाने केलेली असते. या झाडाच्या फळांचा विषारी अर्क बाणांच्या टोकांना लावून शिकारीसाठी आफ्रिकेत त्यांचा उपयोग केला जात असे असेही उल्लेख आहेत. वैद्यकीयदृष्ट्या या झाडाच्या विविध भागांचा उपयोग त्वचारोग, जखम भरून आणणे, मूत्रपिंडाचे विकार, पोटाचे विकार, संधिवात इत्यादी अनेक रोगांवर होत असला तरी हिरडा, आवळा, बेहेडा, नीम, सीता अशोक या झाडांसारखा या बाबतीत हा सामान्य लोकात फारसा प्रसिद्ध नाही हेही तितकेच खरे आहे.

या वृक्षाचा असा उहापोह केल्यावर माझे मन स्त्रियांच्या अत्यंत आवडत्या विषयावर विचार करू लागते, ते म्हणजे याच्यासारख्या हिरव्या रंगाच्या पार्श्वभूमीवर, याच्याच रंगाची, अशीच भडक फुले असलेल्या कापडाचा ड्रेस मी शिवेन का आणि शिवला तरी तो घालेन का?! (ड्रेस ऐवजी साडीचा सुद्धा विचार करता येऊ शकतो!). या प्रश्नाचे उत्तर माझ्या मनात १०० टक्के नकारार्थी असले तरी प्रत्यक्षात मात्र झाड माझ्या द्विधा मनस्थितीला जणू खिजवत, स्वत:च्याच धुंदीत बहरतच राहते आणि मला माहीत असलेले 'सत्य'च पुन्हा अधोरेखित करते....ते म्हणजे, नैसर्गिक सौंदर्य ते नैसर्गिक सौंदर्य....त्याच्यासमोर मानवनिर्मित बेगडी सौंदर्याचा काय पाड?! त्या जाणिवेने मी नतमस्तक होते आणि वर्षभर फुलोरा असणाऱ्या या झाडाचे पुन्हा पुन्हा 'दर्शन' घ्यायला, त्याच्या भडक आकर्षणाचे आकंठ प्राशन करायला अणुशक्तीनगरच्या वळणदार रस्त्यांची वाट धरते!

**संदर्भ –** अचूकतेसाठी तांत्रिक माहिती आंतरजालावरून घेतली आहे.

⌘⌘⌘

**संपर्क :** ३०६, डॅफोडिल, नीलकंठ गार्डन, गोवंडी(पूर्व)
मुंबई ४०००८८ **भ्रमणध्वनी :** ९८६९०५१८१९

# मानसोपचार म्हणजे नेमकं काय?

© तेजस्विनी भावे – कुलकर्णी, पुणे.

'तू मानसोपचार करतेस म्हणजे नेमकं काय करतेस??'

'अगं, पेपरात रोज नवीन आत्महत्त्यांच्या बातम्या येत आहेत, तुम्ही काय करू शकता अशा अवघड वेळी??'

मथळा – वाढत्या आर्थिक समस्यांमुळे समाजाचे मानसिक स्वास्थ्य धोक्यात.

'असली थेरपी बिरपीची कौतुकं नव्हती हो आमच्या वेळी, मन घट्ट ठेऊन वाट्टेल त्या परिस्थितीतून वाट काढायचो आम्ही. नसती थेरं!!'

'एखादा सहा महिन्यांचा डिस्टन्स लर्निंग कोर्स करायचा, ऐकून घेतल्यासारखं हो हो नाही नाही म्हणून मान डोलवायची आणि कॉमनसेन्सला पटेल असा काहीतरी सल्ला द्यायचा म्हणजे झालं कौन्सिलिंग, आहे काय आणि नाही काय, त्यासाठी तुम्हाला इतके पैसे कशाला द्यायचे, हे तर आम्ही पण करू शकतो आरामात.'

माझ्या तोंडावर आणि पाठीमागे अशी बरीच संभाषणे घडतात हे मला नीटच माहीत आहे.

त्यामुळे अजूनही मानसिक आरोग्य जपण्यासाठी एखाद्या तज्ज्ञाची गरज लागणे म्हणजे मूर्खपणा समजणाऱ्या, ते एक मानसोपचार तज्ज्ञ नक्की काय करतो आणि त्याने कशी मदत होते याबद्दल खरंच कुतूहल असणाऱ्या सगळ्यांसाठी हा लेखनप्रपंच!!

मानसोपचार ज्याला इथून पुढे आपण थेरपी म्हणूयात ती २ प्रकारे वापरली जाते.

**पहिला भाग – औषधे** – जी काही मानसिक रोगांवर अत्यंत आवश्यक असतात आणि खूप परिणामकारक ठरतात. शारीरिक आजारांसाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक औषधांप्रमाणे याही औषधांचे काही साईड इफेक्ट असू शकतात. मुळात आपल्याकडे मानसोपचारतज्ज्ञाकडे जाणे हा उपाय आपल्याला त्रास होतोय हेच नाकारणे, तो त्रास लपवून ठेवणे, अंगावर काढणे, तंत्र मंत्र करणे, शरीराच्या डॉक्टरला दाखवणे या सगळ्या पायऱ्यानंतर सगळ्यात शेवटी त्रास हाताबाहेर गेला की मग वापरला जातो. साहजिकच त्यावेळी औषधांचे डोस हे त्रासाच्या प्रमाणात काहीसे जास्त सुचवले जातात आणि त्यानंतर होणारे साईड इफेक्ट अर्थातच जास्ती अधोरेखित होऊन उपचारासाठी लागणारा पुरेसा वेळ आणि नियमितपणा ठेवला जात नाही आणि दोष मात्र डॉक्टरला दिला जातो. (सर्वसाधारण निरीक्षण, सुदैवाने खूपसे अपवाद आहेतच वरच्या मुद्याला)

दुसरा मुद्दा, औषध लिहून देणं हे फक्त सायकीयाट्रीस्ट करतो, ज्याने एम. बी. बी. एस. नंतर सायकीएट्रीमध्ये स्पेशलायझेशन केलं आहे. अर्थात त्यांनासुद्धा थेरपी/बोलून समजावून सांगणे (talking cure) चं ट्रेनिंग दिलं जातंच आणि ते औषध आणि थेरपी अशा दोन्ही प्रकारे मानस उपचार करू शकतात.

**दुसरा भाग – माझ्यासारखे**

सायकॉलॉजिमधून एम.ए. किंवा एम. एस्सी. आणि नंतर एम. फिल., पीएच.डी. घेऊन सायकोथेरपीमध्ये प्रशिक्षित तज्ज्ञ, ज्यांना सायकॉलॉजिस्ट, थेरपिस्ट म्हणलं जातं. आम्ही मानसोपचार मुख्यत: अनेक मानसिक आजार आणि भावनिक अडचणी, मानसिक स्वास्थ्याशी निगडित समस्या यासाठी करतो. ह्या अडचणी अगदी डिप्रेशन सारख्या मानसिक आजारापासून ते व्यक्तिमत्त्वाशी निगडित आजार, व्यसनं, घरगुती कलह, वयाच्या ठराविक टप्प्यावरचे बदल, आत्मविश्वासाचा अभाव, योग्य निर्णय घेण्यात येणारे अडथळे आणि अगदी स्क्रिझोफ्रेनियापर्यंत विविध प्रकारातल्या असू शकतात. या थेरपीचा कालावधी तुमच्या समस्येवर अवलंबून असतो, पण साधारणपणे १२ –१५ सेशन्स हा सरासरी वेळ समजला जातो. काही वेळा थेरपी वर्षभर पण चालू शकते. ही सेशन्स एकच व्यक्ती, समूह, कुटुंब किंवा जोडी (कपल) अशा स्वरूपात होतात. कोरोनाकाळात हे प्रत्यक्ष भेटण्याचं स्वरूप बदलून व्हिडिओ किंवा फोनवरचं सेशन असंही झालेलं आहे.

थेरपी किंवा ज्याला कौन्सिलिंग असं अधिक प्रचलित नाव आहे, म्हणजे बोलण्यातून शोधून काढलेलं औषध/उत्तर. आता हे बोलणं फक्त गप्पा आणि सल्लामसलत या मध्ये नक्कीच मोडत नाही. त्यामुळे सगळ्यात आधी काही गैरसमज दूर करून टाकूयात.

१) तुमच्या थेरपिस्टकडे सगळ्या प्रश्नांची उत्तरं नसतात.

२) काय करायचं काय नाही करायचं असा सगळा आयता सल्ला आम्ही देत नाही.

३) आमचं आयुष्य परफेक्ट, सुतासारखं सरळ नसतं.

थेरपी ही एक गमतीची प्रक्रिया आहे. यात एक जण त्याचं दुखरं मन घेऊन आलाय, आणि दुसरा त्याला मदत करायचा प्रयत्न करतोय. विल्फ्रेड बायन म्हणून गेलाय की जेव्हा २ लोकं भेटतात तेव्हा एक भावनिक वादळ तयार होतं. हे वादळ खरंतर थेरपीच्या मोड ऑफ ॲक्शनबद्दल बरंच काही सांगून जातं. कारण थेरपीमध्ये सुद्धा खूप जिवंत, सतत बदलत जाणारं असं भावनांचं वादळ उठत असतं. समोरच्या माणसाचं वर्तन बदलावं म्हणून केलेलं फक्त विचारांचं यांत्रिक आदानप्रदान नाहीये थेरपी म्हणजे. ती एक अत्यंत जाणीवपूर्वक अशी भावनांच्या चार्जने भारलेली, नेणिवेला प्रत्यक्ष समोर ठेऊन बघता येईल, भूतकाळाला साद घालून वर्तमानात तोलणारी अशी अनुभूती असते. थेरपीमुळे घडणारे बदल हे पुस्तकी स्वरूपात वाचून पूर्णपणे कळू शकत नाहीत, ती अनुभवायचीच गोष्ट आहे.

त्यामुळे थेरपीची पहिली पायरी म्हणजे तुम्ही सांगत असलेल्या सगळ्या गोष्टी पूर्णपणे गोपनीय राहतात. तुमची समस्या आणि त्यासंबधी इतर गरजेची माहिती तुमच्याकडून सविस्तर घेतली जाते. तुमच्या आयुष्याची गोष्ट ऐकवताना तुम्हाला कुठल्याही प्रकारे अपमानित वाटेल, शरम वाटेल, तुम्हाला एक विशिष्ट नजरेतून पाहिलं जाईल अशी शक्यता नसतेच. तुम्ही जसे आहात तसे तुम्हाला स्वीकारणं आणि तुमचा पुर्ण आदर करणं ही थेरपिस्टची पहिली जबाबदारी. तुमचा त्रास, तुमची मतं, तुम्हाला मोकळेपणाने मांडता यावीत, कुठल्याही दडपणाशिवाय तुम्हाला व्यक्त होता यावं असंच स्वत:ला घडवणं ही एक साधना असते आणि ती खूप प्रयत्न करून आम्ही सतत करत राहतो.

तुम्ही आत्ता जसे आहात तसे का आहात, तुमच्या विचार पद्धती, आयुष्यातले महत्त्वाचे प्रसंग आणि त्यांचा तुमच्यावर झालेला परिणाम, लहानपण आणि पालकांनी वापरलेल्या शिक्षा-प्रेम-लाड अशा

संदर्भातल्या आठवणी, तुमच्या चांगल्या-वाईट सवयी, स्वभावाचे कंगोरे, अडचणींना तोंड देताना सवयीने वापरला जाणारा प्रतिक्रिया देण्याचा मार्ग, शारीरिक-मानसिक आंदोलनं, आर्थिक सामाजिक जडणघडण, महत्त्वाची नाती आणि त्यांचं तुमच्या आयुष्यातलं स्थान, या सगळ्यातून तुमचंच स्केच तुमच्यासमोर थेरपिस्ट मांडतो. ही ‘स्व’ची ओळख, ठराविक विचार करायच्या पद्धती ज्या अजिबात मदत करत नाहीत उलट हानी करतात, जीवनशैलीमध्ये हवे असणारे आवश्यक बदल, बऱ्यावाईट सवयी, नात्यांमध्ये असणाऱ्या अवास्तव अपेक्षा आणि त्यामुळे होणारे वाद, या सगळ्यातला कार्यकारणभाव तुम्हाला उलगडून सांगितला जातो. स्वत:कडे थोडं तटस्थ पाहण्याची एक बैठक मिळते. आपली प्रतिमा उजळवणाऱ्या चांगल्या सवयी आणि विचारशैली हळूहळू कशा आत्मसात करता येतील, यासाठी भक्कम पाठिंबा दिला जातो. प्रश्न सोडवत असताना निरुपयोगी आणि त्रासदायक ठरत असलेल्या जुन्या पद्धती (उदा. व्यसनं, हिंसा, एकटं राहणे, इतरांना दोष देणे, जबादारी टाळणे, गोष्टी अर्धवट सोडून देणे इत्यादी) बदलून त्याऐवजी तुमच्या व्यक्तीत्त्वाला साजेशा, प्रॅक्टिकल अशा उपयोगी पद्धती शिकवल्या जातात. बदलत्या परिस्थितीत स्वत:ला कसं बदलायचं, भावनावेगावर नियंत्रण कसं आणायचं, बदल कसा स्वीकारायचा, मोडून न पडता अजून लवचिक कसं बनायचं आणि पुन्हा लवकरात लवकर स्वत:च्या सर्वोत्तम अशा स्थितीमध्ये परत कसं जायचं हे उलगडून सांगितलं जातं.

अर्थात हे बदल प्रत्यक्ष आयुष्यात तुम्हालाच करायचे असतात, दिलेला होमवर्क न चुकता आपल्या वर्तनात तुम्हालाच आणायचा असतो, पण ते व्हावं यासाठी लागणारं भक्कम मानसिक पाठबळ आम्ही देत असतो. स्वत:ला बदलायच्या या उर्मी आधी मी जसा आहे तसा स्वत:ला आनंदाने स्वीकारणं हे एक रोल मॉडेल म्हणून तुमचा थेरपिस्ट तुम्हाला शिकवत असतो. थेरपीनंतर होणारा बदल म्हणजे चमत्कार नसतो, तो एका सेशनमध्ये तर नक्कीच होत नाही. त्यासाठी स्वत:ला पुरेसा वेळ आणि आम्हाला ती संधी द्यावीच लागते.

वर सांगितलेल्या गोष्टी कुठल्याही थेरपिस्टला मानवी मनाच्या पुरेशा अभ्यासानंतरच जमू शकतात. त्यासाठी अनेक वर्षांचा सराव, खूप जास्त अभ्यास, सुपरव्हिजनमध्ये घेतलेली सेशन आणि शिक्षकांचं मोलाचं मार्गदर्शन, आणि मानसिक आरोग्याप्रति खरीखुरी तळमळ या सगळ्यानंतरच एका व्यक्तीच्या आयुष्यात प्रकाश आणण्याचं भाग्य लाभतं.

थेरपी घेण्यात कुठलाही कमीपणा नाही, तुम्ही स्वत:ला महत्त्व देता याचं ते एक उत्तम द्योतक आहे. तुमच्या मनातल्या इतर प्रश्नांची उत्तरंही नक्कीच देईन. काळजी घ्या, स्वत:ला आणि इतरांना सुद्धा जपा!

**संपर्क :** ४, श्री अपार्टमेंट, ७९८, वारजे,
पुणे ४११०५८ **भ्रमणध्वनी :** ९५१२६९६४६१

⌘⌘⌘

## साभार कृतज्ञता


**अरुण अच्युत भावे, अंबरनाथ यांनी त्यांच्या मातोश्री कै. उमाबाई अच्युत भावे यांचे स्मरणार्थ दहा हजार रुपयांची देणगी भावे मित्र मंडळाच्या भावे शिक्षण निधीस दिली आहे. तसेच दिलिपचंद्र पुरुषोत्तम भावे, बडोदा यांनी एक हजार रुपयांची स्वनिधीस देणगी दिली आहे.**

**भावे मित्र मंडळ सर्वांचे अतिशय आभारी आहे.**


## सहवेदना



**अनिल वामन भावे, नाशिक** ह्यांचे दिनांक २९ नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ६९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी भारत सरकार मुद्रणालय, गांधीनगर, नाशिक येथे ४० वर्ष नोकरी केली व ते २०१३ साली निवृत्त झाले. त्यांच्या पश्चात पत्नी अंजली, मुलगा अभिजीत, सून अर्पिता असा परिवार आहे.



**श्री. विष्णू कृष्णा भावे, देऊळवाडा, पाळी, गोवा** यांचे शुक्रवार दि. १७ फेब्रुवारी २०२३ या दिवशी वयाच्या ८२ व्या वर्षी निधन झाले. ते श्री नवदुर्गा देवस्थान देऊळवाडा, पाळी, गोवा येथे अर्चक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन पुत्र, सुना, दोन विवाहित मुली, नातवंडे असा परिवार आहे.



**मंगला गोपाळ भावे, नागदा** यांचे दि. १३ फेब्रुवारी २०२३ या दिवशी वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात सुनील, अनील व मधुकर ही तीन मुले, सूना, विवाहित मुलगी, जावई, नातवंडे, पणतु असा परिवार आहे. त्यांनी शासकीय आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून ३५ वर्षे नोकरी केली.



**कमल अनंत भावे, पुणे** यांचे दि. १४ मार्च २०२३ या दिवशी वयाच्या ९० वे वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात प्रभाकर, विनोद, माधव ही तीन मुले, सुना, कलावती व प्रतिभा या दोन मुली, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.



**नर्मदा शंकर भावे, उज्जैन** यांचे दि. २४ मार्च २०२३ या दिवशी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे दीर दत्तात्रेय त्र्यंबक भावे, सुनंदा व कल्पना या दोन मुली, जावई, नकुल व मोहित हे दोन नातू, असा परिवार आहे.

**मृतांच्या आत्म्याला सद्गती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.**

फेब्रुवारी २०२२ च्या अंकात अविनाश श्रीपाद भावे यांच्या निधनाची तारीख दि. २६ ऑक्टोबर अशी छापली होती. ती त्या ऐवजी २७ ऑक्टोबर २०२२ आहे.

# सहवेदना

**संपदा श्रीराम भावे, पुणे** यांचे दि. ८ मार्च २०२३ या दिवशी वयाच्या ७० व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, वाडेश्वर समुहाचे संस्थापक श्रीराम नारायण भावे, मुलगा स्वानंद, सून, विवाहित मुलगी स्वरूपा, जावई, नातवंडे, असा परिवार आहे. कृष्णा डायनिंग हॉल मार्फत कृष्णा थाळीची प्रसिध्दी त्यांच्या पाककलेच्या कौशल्याने पुण्यात झाली होती. माहेराहून राष्ट्रभक्ती व समाजकार्याचे संस्कार घेऊन त्यांनी व्यवसायामध्ये सामाजिक बांधिलकीचा वसा जपला होता.



कृष्णा डायनिंग हॉल सुरू करण्यापूर्वी भावे कुटुंबियांचा वाडेश्वर हॉटेल व कल्पक केटरर्स या नावाने व्यवसाय सुरू होता. एकदा संपदा भावे आणि त्यांचे पती श्रीराम भावे यांनी एका घरगुती कार्यक्रमासाठी पुण्यातील एका डायनिंग हॉलमध्ये १०-१२ जणांसाठी टेबल बुक केलं. प्रत्यक्षात त्यांना एकत्र बसून जेवणाचा आस्वाद घेता आला नाही, एवढेच नाही तर एकूणच पदार्थ व डायनिंग हॉलमधली सर्व्हिसही ठीक नव्हती. संपदा भावे यांना ते योग्य वाटले नाही. त्यांचा तक्रारीचा सूर ऐकून श्रीराम भावे त्यांना सहजच म्हणाले की, 'तुझ्या मनात आहे तसं जेवण देणारा डायनिंग हॉल तूच का सुरू करीत नाहीस?'

मुळात स्वयंपाकाची आवड असल्याने या विचाराने त्यांच्या मनात घर केलं. कल्पक केटरर्समध्ये त्या मदत करीत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात पदार्थ करताना काय करावं लागतं याचा त्यांना अनुभव होताच. त्यातच लॉ कॉलेज रोडवर कृष्णा डायनिंग हॉल या नावाने असलेला एक डायनिंग हॉल बंद होणार असल्याचे भावे कुटुंबियांना समजले. वाडेश्वर हॉटेलचा अनुभव पाठीशी असल्याने कृष्णा डायनिंग हॉलच्या जुन्या मालकाने आपला व्यवसाय स्वखुषीने भावे कुटुंबियांच्या स्वाधीन केला. भावे कुटुंबियांचे महाबळेश्वर येथील वेण्णा रेस्ट्रॉरंट बंद झाले होते. त्या रेस्ट्रॉरंटमधील कामगार उपलब्ध होतेच. त्यामुळे कृष्णा डायनिंग हॉल विना अडचण सुरू झाला. सुरवातीला ग्राहक कशा प्रकारचा असेल याची काहीच कल्पना संपदा भावे यांना नव्हती. पण कालांतराने चाळीशीच्या पुढच्या वयोगटातील ग्राहकांची पसंती मिळू लागली व महिलांचे भिशीचे ग्रुपस, वाढदिवस, मित्र-मैत्रिणींची गेट टुगेदर्स, केळवण, व्याही भोजन, डोहाळे जेवण अशांसाठी कृष्णा डायनिंगची निवड होऊ लागली.

संपदा भावे पूर्ण आठवड्याचा दोन्ही वेळचा मेनू ठरवू लागल्या. त्यात चवीत वैविध्य राहील यावर त्यांचा भर असे. इतर डायनिंग हॉलमध्ये न मिळणारे पदार्थही त्यांचेकडे असत. गरम मऊसूत पोळी वाढण्याचा त्यांचा आग्रह असे. त्यासाठी त्या विशिष्ठ एकाच जातीच्या गव्हाची कणीक वापरत असत. कच्च्या मालाच्या खरेदीसाठी त्या स्वत: बाजारात जात असत. पदार्थ बनवितानाचे मसाले त्या आपल्या डायनिंग हॉलच्या स्वयंपाकघरातच तयार करीत असत. सुरवातीस भाजी खरेदी मंडईतून करीत असत पण कालांतराने शेतकऱ्यांकडून भाजी घेणे सुरू केले. स्वयंपाकघरातील सर्व प्रक्रियांवर त्यांची देखरेख असे. चवीवर अनिष्ट परिणाम करणाऱ्या प्रक्रिया त्यांनी कामगारांना समजावून सांगितल्या होत्या. पदार्थ ग्राहकांना वाढण्यापूर्वी त्याची चव त्या स्वत: घेत असत. चवीत काही कमीजास्त असेल तर कागदावर लिहून लेखी सूचना त्या देत असत. त्याप्रमाणे पदार्थ दुरूस्त करून मगच ग्राहकास वाढला जात असे. उपवासाचे दिवशी उपवासाच्या पदार्थांची पूर्ण थाळी तिथे मिळते. दर वेळेस उपवासाचा एखादा वेगळा पदार्थ तिथे असतो. या थाळीसाठी लोकांची रांग लागते.

एखाद्या मोठ्या ग्रुपने बुकिंग केले तर त्या ग्रुपच्या मागणी व आवडीनुसार संपदा भावे त्यांना मेनू तयार करून देत असत. केळवण, वाढदिवस या साठी जर बुकिंग केले असेल तर त्या ग्रुपमधील उत्सवमूर्तीला चांदीचे ताट व ताटाभोवती महिरप याचीही व्यवस्था त्या करीत असत. या साध्या साध्या गोष्टींमधून त्यांनी ग्राहकांची मने जिंकली होती. कृष्णा डायनिंग हॉलमधील अळूची भाजी अनेकांना आवडते. अळूच्या भाजीचा एक वार ठरवून ती त्या दिवशी केली जाते. त्या दिवशी अनेकजण तिथे जेवायला येतातच पण पार्सलने भाजी नेणाऱ्यांची संख्याही खूप आहे.

कॉपोरेट क्षेत्रात संपदा भावे यांनी निर्माण केलेली कॉर्पोरेट थाळी खूप प्रसिध्द आहे.

गर्दीचे वेळी वाढपी संख्या कमी असेल तर त्या स्वत: वाढायला मदत करीत असत. ग्राहक संतुष्ट होणं त्यांना अधिक महत्त्वाचं वाटे. अत्यंत मृदू स्वभावाच्या असल्याने डायनिंग हॉलमधील कर्मचाऱ्यांशी त्यांचे वागणे तसेच असे.

आत्तापर्यंत विविध क्षेत्रातील अनेक नामवंत मंडळी त्यांचेकडे जेवून गेली आहेत. आवर्जून लक्षात राहतील असे अनुभव संपदा भावे यांच्याकडे जमा झाले होते. 'त्यांच्या चवीचा स्वयंपाक तुला येत नाही.' असे म्हणणारे अनेक जण त्यांना भेटले होते. भजनी मंडळाच्या ग्रुपमधील ८-१० बायका जेवण झाल्यावर संपदा भावे यांना भेटून म्हणाल्या की, 'इथले सगळे पदार्थ उत्तमच आहेत, पण जेवणात तुमचे संस्कार उतरले आहेत असं वाटतं.'

करोनाकाळात डायनिंग हॉल बंद झाला. नंतर पुन्हा नव्या उमेदीने सुरूवात झाली. गेली वीस-बावीस वर्षे सुरू असलेला हा उद्योग, त्याच्या प्रवासाचा चढता आलेख संपदा भावे यांनी बघितला आहे. एक यशस्वी उद्योजिका म्हणून त्यांनी स्वत:ला सिध्द केले होते.

घरातील गृहिणी सालस, सोज्वळ, सात्विक असेल तर घरातलं वातावरण शांत, समाधानी व प्रसन्न रहातं त्याप्रमाणेच त्यांनी कृष्णा डायनिंग हॉल हा आपल्या घराप्रमाणेच ठेवला.

**त्यांच्या आत्म्याला सद्गती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.**

## काळाराम मंदीर, नाशिक.

**प्रतिनिधी, नाशिक –** नानासाहेबांनंतर पेशवेपद कोवळ्या वयात द्वितीय पुत्र माधवरावांना देण्यात आले. माधवराव पेशवे कारभार व्यवस्थित चालवित होते. रघुनाथराव पेशवे नानासाहेबांचे लहान भाऊ होते, ते आधी निजामाला मदत मागायला गेले होते, पण नंतर त्यांनी निजामाशी संबंध तोडून टाकले. निजामाने चिडून माधवराव पेशवे, रघुनाथराव पेशवे नसताना पुणे लुटले, पण निजामाला मदत करणारे आप्तस्वकीय म्हणजे मल्हारराव रास्ते, माधवरावांच्या आईचे सख्खे भाऊ होते, त्यांनी त्यांच्या मामांना ५००० रुपये दंड केला. गोपिकाबाई माधवराव पेशव्यांना म्हणाल्या, 'तू नाते विसरलास! नशीब आपले नाते नाही विसरलास! दंड मागे घे!' त्यांना वाटले आपला शब्द मोडण्याची, मुलाची हिंमत होणार नाही. पेशवे म्हणाले, 'आम्ही जेव्हा पेशवे पदावर बसून निर्णय देतो, तेव्हा तो पेशव्यांचा निर्णय असतो, त्यावेळेस कोणतेही नाते लक्षात घेतले जात नाही.' ते त्यांच्या निर्णयावर ठाम राहिले.

'जिथे आमच्या शब्दाला मान नाही, तेथे आम्ही पाणी सुध्दा पिणार नाही. रास्ते घराण्याचा अपमान सहन करणार नाही. आम्ही आता गंगापूर गावी जावून रहाण्याचा निर्णय घेतला आहे.'

गोपिकाबाईंचा हट्टी, करारी, स्वाभिमानी स्वभाव माधवरावांना माहित होता. त्यांचा शद्ब म्हणजे काळ्या दगडावरची रेघ. त्यांनी गोपिकाबाईंबरोबर त्यांचे लहान बंधू गंगाधरपंत यांना त्यांच्याबरोबर काळजी घेण्यासाठी पाठवले.

गोपिकाबाई पंचवटीत गेल्या. तेथे त्यांना लाकडांच्या ओंडक्यांनी व फळ्यांनी बांधलेले प्रभू रामचंद्रांचे लहानसे मंदिर पहावयास मिळाले. आत राम, सीता व लक्ष्मण यांच्या तीन काळ्या पाषाणातील सुबक, सुरेख मूर्ती होत्या. गोपिकाबाई त्यांचे बंधू गंगाधरपंतांना म्हणाल्या, 'दादा, ताबडतोब सरदार रंगराव ओढेकरांना बोलावून घ्या.' थोड्याच वेळात ते तेथे अश्वावर स्वार होऊन हजर झाले. त्या म्हणाल्या, 'आम्हाला या मूर्तीबद्दल व मंदिराबद्दल माहिती हवी आहे.'

'बाईसाहेब येथून जवळच तपोवन आहे, नाथपंथी साधूंचे तेथे आखाडे, झोपड्या आहेत. स्नानासाठी जवळ असलेल्या अरुणा व वरुणा नद्यांच्या संगमावर जातात. संगमावर स्नान करत असताना एका साधूच्या पायाला कठीण काहीतरी लागले म्हणून त्याने पाण्यात बुडी मारली, तेव्हा स्वयंभू रामाची मूर्ती व अजून शोध घेतल्यावर सीता, लक्ष्मणाच्या मूर्ती मिळाल्या. त्यांनी जवळचे ओंडके, फळ्या जमा करून हे मंदीर उभे केले.'

त्या म्हणाल्या, 'येथे प्रभू रामचंद्रांचे भव्य मंदिर झाले पाहिजे!'

रंगराव म्हणाले, 'त्र्यंबकेश्वराच्या मंदिरासारखे प्रभू श्रीरामाचे मंदिर येथे उभारू. त्यासाठी लागणारा खर्च आम्ही करू.' सन १७७८ मध्ये, सरदार रंगरावांनी श्रीरामाचे मंदिर बांधण्याची जबाबदारी स्वीकारून कामाला सुरुवातही केली. मंदिराच्या घुमटाचे काम सुरू झाले, तेव्हा घुमटासाठी लागणारे कोरीव काम केलेले दगड हत्तीच्या पाठीवरून बांधकामापर्यंत आणून मग दोराला बांधून वर उचलत होते. दोन कामगार खालून वर आधार देत होते, तर वरती चार कामगार दगड योग्य ठिकाणी ठेवत होते.

मंदिराच्या गाभाऱ्यात कोरीव काम केले आहे. खांबांवर पण सुंदर कोरीव काम केलेले आहे. मंदीराच्या भोवती तटबंदी आहे, पूर्व, दक्षिण, उत्तर दरवाजे आहेत.

राम, लक्ष्मण व सीतामाई, तिघांच्या तर मूर्ती होत्या पण हनुमानाची मूर्ती सापडली नव्हती. एका कारागीराने काळ्या दगडातील हनुमानाची मूर्ती घडवली. मंदिरासमोर असलेल्या बैठ्या सभामंडपात हनुमानाची मूर्ती ठेवलेली आहे. सभामंडपात चाळीस खांब आहेत. मंदिराच्या चारही बाजूने ओवऱ्या बांधलेल्या आहेत. ओवऱ्यांच्या कमानींची कलाकुसर केलेली आहे. मानवजन्म ८४ योनीतून फिरून प्राप्त होतो म्हणून ओवऱ्यांची संख्या ८४ आहे. चौदा वर्षे रामाला वनवासात रहावे लागले त्याची आठवण म्हणून मंदिरात जाण्यासाठी चौदा पायऱ्या चढून जावे लागते.

तूळ संक्रांतीच्या दिवशी सूर्योदयाची कोवळी किरणे प्रभू रामचंद्रांच्या मुखकमलावरच पडतात. रंगराव ओढेकरांनी स्वत:चे त्या काळातील तेवीस लाख खर्चून काळ्या पाषाणातून अप्रतिम कलाकुसरीने बारा वर्षे अथक परिश्रम घेऊन काळाराम मंदिर उभारलेले आहे. 'काळाराम मंदिर' १७९० मधे बांधून पूर्ण झाले.

**महत्त्वाची वैधानिक सूचना –** 'भावे–प्रयोग' या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्याचे सर्व लेखनाधिकार त्या त्या लेखकांकडे आहेत. या अंकातील साहित्य अन्यत्र प्रकाशित करण्यापूर्वी त्या त्या लेखकांकडून पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. – संपादक.

**संपादक मंडळ : अभय शंकर भावे, संपादक**
शशिकिशोर दत्तात्रेय भावे, पर्शराम गोविंद भावे,
उदय नारायण भावे, शिल्पा मंदार भावे. (सल्लागार)

प्राजक्त

'प्राजक्त' हे सायंदैनिक मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांनी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट–गंगावेश रोड कोल्हापूर–४१६००२ येथे छापून प्राजक्त कार्यालय, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट–गंगावेश रोड, कोल्हापूर–४१६००२ येथून प्रसिध्द केले.
**संपादक : प्रफुल्ल डबीर. फोन : 0231-2540427**
**email -** prajakaweekly@gmail.com
RNI NO. : **M-6 (1457) / 70-RNI**
**Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS**